अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## WTC Final वर ऑस्ट्रेलियाकडे २९६ धावांची आघाडी

**ओव्हल :** जागतिक कसोटी विजेतेपदाच्या फायनलवर ऑस्ट्रेलियानं तिसऱ्या दिवशी आपली पकड घट्ट केली आहे. या कसोटीत ऑस्ट्रेलिया तिसऱ्या दिवसअखेर ४ बाद १२३ धावांची मजल मारली आहे. ऑस्ट्रेलियानं पहिल्या डावात १७३ धावांची आघाडी घेतली होती. त्यामुळं लंडनच्या ओव्हल मैदानावर सुरु असलेल्या कसोटीत ऑस्ट्रेलियाची एकूण आघाडी २९६ धावांची झाली आहे. रविंद्र जाडेजा याने दोन तर उमेश यादव आणि मोहम्मद सिराज यांनी




प्रत्येकी एक एक विकेट घेतली. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा मार्नस लाबुशेन ४१ तर कॅमरुन ग्रीन ७ धावांवर खेळत होते.

त्याआधी या कसोटीत टीम इंडियानं पहिल्या डावात सर्व बाद २९६ धावांची मजल मारली. अजिंक्य रहाणे आणि शार्दूल ठाकूर या मुंबईकरांनी झुंजार फलंदाजी करून टीम इंडियाची लाज राखली. त्या दोघांनी सातव्या विकेटसाठी १०९ धावांची भागीदारी रचून भारतीय संघाला फॉलोऑनपासून वाचवलं. अजिंक्य रहाणेनं १२९ चेंडूंत ११ चौकार आणि एका षटकारासह ८९ धावांची, तर शार्दूल ठाकूरनं १०९ चेंडूंत सहा चौकारांसह ५१ धावांची खेळी उभारली.

www.surajyadigital.com | शनिवार, दि. १० जून २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २५१ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# भर दुपारी घरातच पडली 'रेड'



# ८ लाखांच्या लाचेचा झाला भांडाफोड

सुराज्य/सोलापूर

**पोलीस दलासह सरकारी व निम सरकारी क्षेत्रातील लाचखोरीने सारा महाराष्ट्र चिंतेत असतानाच मराठी माणसाला मान खाली घालावी अशी एक संतापजनक प्रकार शुक्रवारी पुण्यात घडला.एका कंत्राटदाराकडून एक दोन नव्हे तर तब्बल आठ लाखांची लाच घेताना पुण्याचे अतिरिक्त विभागीय आयुक्त डॉ.अनिल रामोड यांना रंगहाथ पकडले.एक उच्चपदस्थ अधिकारी लाच खाताना सापडल्याने राज्याच्या प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे.शासकीय निवासस्थानातच सीबीआची रेड पडली.दिवसभरात त्यांच्या घराची झाडाझडती घेण्यात आली. सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी लागलीच पैसे मोजण्याची मशीन मागवल्याने सापडलेले घबाड मोठे असल्याचा संशय आहे.काही दिवसांपूर्वी शिक्षण आयुक्तांनी ४० अधिकाऱ्यांची चौकशी करण्याचे पत्र लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे दिल्याचे प्रकरण ताजे असतानाच रामोड यांच्या सारखा महसूल विभागातील उच्चाधिकारी लाच प्रकरणात सापडल्याने राज्याची चिंता अजून वाढली आहे.**

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की- दुपारी एकची वेळ... बाणेरमधील 'ऋतुपर्ण' सोसायटींत अनेक उच्चपदस्थ अधिकारी राहतात. परिणामी या सोसायटींत नेहमीच व्हीआयपींचा कायमच वावर असतो. अचानक काही चारचाकि वाहनांमधून 'सीबीआय'चे अधिकारी दाखल झाले. त्यांनी सोसायटीच्या कोणत्याच यंत्रणेला न जुमानता रामोड यांच्या घराचा ताबा घेतला. अचानक पडलेल्या या धाडीमुळे सोसायटीच्या सुरक्षारक्षकांसह मॅनेजरचीही चांगलीच भंबेरी उडाली. सीबीआयच्या या छाप्याची माहिती मिळताच चतु:श्रृंगी पोलीसही अॅक्शन मोडमध्ये आले. त्यांनी रामोड यांच्या निवासस्थानाकडे तत्काळ धाव घेतली. सोसायटींत दाखल झाल्यानंतर मॅनेजरसोबत त्यांनी चर्चा केली. अधिकाऱ्यांनी सोसायटीची परवानगी घेतली का ? ते खरे की आहेत खोटे? यासारखे प्रश्न पोलिसांकडून सोसायटीच्या मॅनेजरला विचारण्यात आले. मॅनेजरने सीबीआयच्या अधिकाऱ्यांसोबत संवाद करवून दिला. हे सीबीआयचे पथकच असल्याची खातरजमा झाल्यावर पोलिसांनी तेथून काढता पाय घेतला.

'सीबीआय'च्या पथकात सुमारे १२ ते १५ जणांचे पथक होते. साधारण दुपारी एक वाजण्याच्या सुमारास सीबीआयच्या पथकाची पहिली गाडी बाणेरमधील रामोड यांच्या घरी दाखल झाली. त्यानंतर १० मिनिटांनी दोन गाडया आल्या. सोसायटीच्या सुरक्षेला न जुमानता हे पथक थेट इमारतीच्या 'सी' विंगमधील चौथ्या मजल्यावर जात रामोड यांच्या घराचा ताबा घेतला. घराचा दरवाजा लावून घेत त्यांनी चौकशी सुरू केली. यावेळी सीबीआयच्या पथकाच्या हाती मोठे घबाड लागल्याची चर्चा आहे.

## विभागीय अतिरिक्त आयुक्त डॉ. रामोड सीबीआयच्या जाळ्यात
## शासकीय निवासात मोठे घबाड सापडल्याची चर्चा





**राज्यात चिरीमिरी जोरात :** एका बाजूला स्वच्छ पारदर्शक कारभार होत असल्याचा दावा करणारे पोस्टर, बोर्ड सरकारी कार्यालयात दिसणे आणि त्याच वेळेस टेबलाखालून चिरीमिरी घेत असलेले कर्मचारी, अधिकारी असणे ही नवीन बाब नाही. काही दिवसांपूर्वी नाशिकमध्ये शिक्षण, महसूल विभागात भ्रष्टाचाराचे प्रकरण समोर आले. त्यातच आता, राज्यात भ्रष्टाचार किती बोकाळला आहे, याची माहिती देणारा अहवाल समोर आला आहे. मागील काही महिन्यात राज्यात भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली आहेत. राज्यात १ जानेवारी ते ७ जून २०२३ या कालावधीत ३४ प्रशासकीय विभागांमध्ये कारवाई करून भ्रष्टाचाराची ३७७ प्रकरणे उघड झाली आहेत. विशेष म्हणजे यातील फक्त १२ जणांनाच शिक्षा झाली आहे.

**कंत्राटदाराचे धाडस... :** मिळालेल्या माहितीनुसार रामोड यांनी हायवे लगत असलेल्या जागेचा परतावा लवकर मिळावा यासाठी लाच मागितली होती, असे सांगण्यात येते. त्यामुळे तक्रारदाराने या संदर्भात सीबीआयकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर मिळालेल्या तक्रारीची तातडीने दखल घेत सीबीआयने छापेमारी करत रामोड यांना आठ लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले आहे. सीबीआयने सापळा रचून ही कारवाई केल्याचे सांगण्यात आले.

**कीड काही थांबेना... :** भ्रष्टाचार थांबवण्यासाठी राज्य सरकार आणि अनेक संघटना विविध प्रयत्न करत आहेत. मात्र, राज्यातील भ्रष्टाचाराची कीड थांबवता काही थांबेना. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने राज्यात विविध ठिकाणी केलेल्या कारवायांमध्ये ५३५ प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्यावर ठपका ठेवण्यात आलेला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ४७ पैकी ३४ प्रशासकीय विभाग भ्रष्ट असल्याचे दिसून आले आहे. ४७ पैकी ३४ विभागातील कर्मचारी-अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये ५३५ अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे.

**कोणत्या विभागात किती कारवाई? :** राज्यात गेल्या पाच महिन्यांमध्ये मुंबई १७, ठाणे ५०, पुणे ६७, नाशिक ७९, नागपूर ३५, अमरावती ४०, छत्रपती संभाजीनगर ६४ आणि नांदेड २५ प्रकरणे समोर आली. २०२२ च्या तुलनेत २०२३ यावर्षी पाचव्या महिन्यापर्यंत १७ टक्क्याने भ्रष्टाचार वाढला असे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईत दिसून येत आहे.प्रथम श्रेणीतील २२, तर द्वितीय श्रेणीतील ६६ अधिकारी यांचा समावेश आहे. असे असूनही केवळ ९ प्रकरणांत संबंधितांवर आरोप सिद्ध झाले. या ९ प्रकरणातील केवळ १२ जणांना शिक्षा झाली. कारवाई झालेल्या अनेक अधिकारी कर्मचारी पुन्हा विविध पदावर कार्यरत असल्याचे धक्कादायक चित्र देखील अहवालातून समोर आले आहे.

---

### औरंगजेबचा फोटो स्टेटसवर ठेवल्याने
## कुंभारी विडी घरकुल येथील तरूणाला अटक

सुराज्य/अक्कलकोट

धार्मिक भावना दुखावण्याच्या हेतूने मोबाईल स्टेटस्वर औरंजेबाचा फोटो ठेवून आक्षेपार्ह मजकूर लिहिल्याचा प्रकार गोदुताई परुळेकर विडी घरकुल, कुंभारी येथे गुरुवारी दुपारी तीनच्या सुमारास उघडकीस आला. याची माहिती मिळताच वळसंग पोलीस ठाण्याच्या पथकाने त्या युवकाला तत्काळ ताब्यात घेऊन न्यायालयात हजर केले असता त्याला सोमवारपर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे.

गुरुवारी दुपारी तीनच्या सुमारास संशयित आरोपी शोहेब मंगळूरकर (रा. ५९८/४, अ विभाग, नवीन विडी घरकुल, कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर) याच्या मोबाईल स्टेटस्वर औरंजेबाचा फोटो ठेवून धार्मिक भावना दुखावण्याबरोबरच दोन समाजामध्ये तेढ निर्माण होईल असे लेखन केल्याचे आढळून आले. हा प्रकार लक्षात येताच अनिरुद्ध जगदीश फलमारी यांनी वळसंग पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि अनिल सनगल्ले यांच्याशी संपर्क साधून माहिती दिली. सनगल्ले यांनी तत्काळ पोलीस पथकासह तपासाची चक्रे फिरवून संशयित आरोपी शोहेब मंगळूरकर याला ताब्यात घेतले. याबाबत अनिरुद्ध फलमारी यांनी फिर्याद दिली आहे. त्याच्यावर भादविसं कलम १५३ अ, १५३ (ब), २९५अ, ५०५ (२) प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून, घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, सपोनि अनिल सनगल्ले यांनी भेट देऊन नागरिकांना शांततेचे आवाहन केले आहे.

**कायदा सुव्यवस्था बिघडू नये**

दोन समाजामध्ये तेढ निर्माण होईल, धार्मिक भावना दुखावेल, असे कृत्य करुन कायदा सुव्यवस्था बिघडू नये. असे आढळून आल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल. अशा घटना घडल्यास नागरिकांनी संपर्क साधावा. कोणीही घाबरु नये.

**- सपोनि अनिल सनगल्ले,**
प्रभारी अधिकारी,
पोलिस ठाणे, वळसंग



## मंत्री चव्हाण यांनी घेतलेश्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

राज्याचे सार्वजनिक बांधकाम, अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री रविंद्र चव्हाण यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने तहसीलदार सुशील बेल्हेकर यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार समाधान आवताडे, राहुल कुल, माजी आमदार प्रशांत परिचारक, मुख्य अभियंता अतुल चव्हाण, अधिक्षक अभियंता संजय माळी, कार्यकारी अभियंता दत्तात्रय गावडे, अमित निमकर तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

## लांबोटी शिवारात अपघात; तरुणाचा मृत्यू

सुराज्य/मोहोळ

मोटर सायकल व ट्रक च्या अपघातात एक जण ठार झाला ही घटना लोबोटी शिवारात शुक्रवारी दुपारी दीड वाजणे च्या सुमारास घडली निलेश सिध्देवर मेलगे असे मृत तरुणाचे नाव आहे.

मोहोळ तालुक्यातील आष्टे येथील निलेश सिध्देश्वर मेलगे हा त्याच्या मोटार सायकल (क्र. एम.एच. १३, बी.जी. १६२२) वरून सोलापूर कडे निघाला होता. त्याच दरम्यान पुण्याकडून सोलापूर कडे भरधाव वेगात ट्रक (क्र.एन.एल. ०१, एन.२६४९) निघाली होती. त्या ट्रकने मेलगे याच्या मोटार सायकलला पाठीमागून जोराची धडक दिली. त्यामुळे मेलगे याची दुचाकि समोरून विरुद्ध दिशेने येणाऱ्या भारत गर्जेंद्र शिंदे (रा. लांबोटी) यांच्या मोटार सायकलला धडकली.

या विचित्र अपघातात ट्रकचे चाक निलेश मेलगे याच्या डोक्यावरून गेल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला तर भारत शिंदे हे जखमी झाले. याप्रकरणी अमोल मेलगे याने दिलेल्या फिर्यादीनुसार ट्रकचालक सैदनाथ गणेश सानी (रा.बिहार) याच्या विरोधात मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

## पंढरपूर येथे वाहनासह २१ लाखाचे चंदन जप्त

### दोघा आरोपींना ७ दिवसांची कोठडी

सुराज्य/पंढरपूर

चंदनाची चोरी करून पर राज्यात विक्रिसाठी जाणाऱ्या एका टेम्पोवर पोलिसांनी छापा टाकून पांढरे चंदन, रोख रक्कम आणि वाहन असा एकूण २१ लाख ३ हजार रुपयांचा माल जप्त केला.

या प्रकरणात दोघा आरोपींना अटक करून पोलिसांनी ७ दिवसाची पोलीस कोठडी घेतली. ही कारवाई गुरुवारी सकाळी



पंढरपूर ते कोर्टी रोडवरील पंतनगर येथे करण्यात आली. मोहम्मद अश्रफअली (वय ३०रा.केरळ) आणि सुनील भाऊ खारिया (वय ३० रा. चिपरा पश्चिम बंगाल) अशी अटक करण्यात आलेल्या ड्रायव्हर आणि क्लीनरची नावे आहेत . त्यांना ७ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश पंढरपूरच्या न्यायालयाने आज शुक्रवारी दिला. ते दोघेजण केए०१-एसी- ०६६५ या क्रमांकाच्या आयशर टेम्पो मधून १२ गोण्यामध्ये एकूण २५३ किलो पांढऱ्या चंदनाची लाकडे भरून परराज्यात निघाले होते. गुरुवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास पंढरपूरच्या पोलिसांनी कोर्टी रोडवर टेम्पो अडवला. तेव्हा त्यात चंदन आणि रोख ८५ हजार २०० रुपये आढळून आले. पोलिसांनी दोघांना अटक करून त्यांच्याविरुद्ध चोरी आणि भारतीय वन विभाग अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल करून सर्व माल जप्त केला . पुढील तपास पोलीस निरीक्षक फुगे करीत आहेत.

## तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

किरकोळ कारणावरून घरात रागावल्याने एका १८ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना तळेहिप्परगा (ता.उत्तर सोलापूर) येथे गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली.

समर्थ अंकुश पाटोळे (वय १८ रा.तळेहिप्परग) असे मयताचे नाव आहे. काल दुपारच्या सुमारास घरात कोणी नसताना त्याने छताच्या लोखंडी अँगलला केबलच्या साह्याने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून घरातील लोकांनी खाजगी रुग्णालयात दाखल केले होते. मात्र तो उत्तरापूर्वी मयत झाला. मयत समर्थ हा रिक्षा चालवत होता. दोन दिवसापूर्वी त्याने नात्यातील लहान मुलाला दुचाकिवरून फिरवण्यास नेला होता. त्यावेळी मुलगा खाली पडून जखमी झाला होता. तेंव्हा घरातील लोकांनी त्याला रागावले होते. त्याचा मानसिक त्रास झाल्याने त्याने आत्महत्या केली. असा अंदाज व्यक्त केला जात आहे

## सळई आणि कोयत्याने मारहाण

**सोलापूर :** घराजवळ राहायचे नाही . या कारणावरून झालेल्या भांडणात कोयता दगड आणि सळईने केलेल्या मारहाणीत महिलेसह दोघेजण जखमी झाले. ही घटना हत्तरसंग (ता.दक्षिण सोलापूर ) येथे गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली. संगप्पा धोंडप्पा वाघमारे (वय ३०) आणि गौराबाई वाघमारे (वय ५५ रा. हत्तरसंग) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले

---

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




कालपर्यंत ते एकमेकांवर वाईट वाईट आरोप करायचे !!!

कल्याण
569-00-479

मेन बाजार
114-63-120


# ४५ दिवसांची मुदत उद्या संपणार सोमवारी मनपा 'सुरुंग' लावणार का?

## 'चिमणी' प्रकरणी २० जूनला कारखान्याच्या याचिकेवर सुनावणी

सुराज्य/सोलापूर

चिमणी पाडकामाविरोधात सिद्धेश्वर साखर कारखान्याने दाखल केलेली याचिका हायकोर्टाने फेटाळली असून पुढील सुनावणी २० जून रोजी ठेवली आहे. महापालिकेने चिमणी पाडकामासाठी दिलेली ४५ दिवसाची मुदत अकरा ११ जून रोजी संपत आहे. आता महापालिका काय भूमिका घेते?, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सोलापूरच्या विमानसेवेला अडथळा ठरणारी सिद्धेश्वर कारखान्याची चिमणी पाडण्याबाबत महापालिकेने दिलेली ४५ दिवसाची मुदत दि. ११ जून रोजी संपत आहे.

तत्पूर्वी सिद्धेश्वर कारखान्याने चिमणी वाचवण्यासाठी पुन्हा हायकोर्टात धाव घेतली आहे. याची सुनावणी दि. १२ जून रोजी होणार होती. हायकोर्टाने कारखान्याला आता २० जूनची मुदत दिली. मात्र चिमणीच्या पाडकामाला स्टे दिला नाही. त्यामुळे चिमणी पाडण्याची महापालिकेच्या मुदतीबाबत कोणताही निर्णय दिलेला नाही. त्यामुळे महापालिकेला मुदत संपल्यावर कारवाई करण्याचा अधिकार आहे तसाच राहिला आहे. आता महापालिका प्रशासन यावर काय निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.



**महापालिका काय करेल माहिती नाही : काडादी**

चिमणी पाडकामाला स्टे दिला नाही. आपण ऑर्डर पाहिली नाही. महापालिका मुदतीनंतर काय करेल माहिती नाही, असे कारखान्याचे मार्गदर्शक संचालक धर्मराज काडादी यांनी सांगितले.

**थोडक्यात माहिती**

२५ डिसेंबर २०१२ साली कारखान्याचा एनओसीसाठी अर्ज केला. १८ फेब्रुवारी २०१४ रोजी एअरपोर्ट अथॉरिटीने कलेक्टरला पत्र लिहून बेकायदेशीर चिमणी बांधली जात असल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर कलेक्टरने महापालिकेला पत्र पाठवून ही चिमणी पाडण्याचे आदेश दिले होते. २४ फेब्रुवारी रोजी महापालिकेने कारखान्याला पत्र लिहून सात दिवसात चिमणी पाडा अशी नोटीस देताच कारखान्याच्या एमडी यांनी तीन मार्च २०१४ रोजी सात दिवसाऐवजी आम्हाला ९० दिवसांची मुदत द्या आम्ही चिमणी पाडून घेतो असं लेखी पत्र महापालिकेला दिल आहे. त्यानंतर १२ एप्रिल २०१७ रोजी कारखान्याने हायकोर्टात धाव घेतली. पुन्हा कारखान्याने ही चिमणी पाडून घेतो असे लेखी पत्र देखील दिले होते. जिल्हा न्यायालय, हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टात कुठेही कारखान्याच्या बाजूने निकाल लागला नाही. सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार महापालिका आयुक्तांनी विलंबाने का होईना सुनावणी घेऊन त्याचा निकाल २८ मे रोजी दिला आणि चिमणी बेकादेशीर ठरवत ४५ दिवसात चिमणी पाडावी असा आदेश दिला.

**महापालिकेने कारवाई करावी : थोबडे**

कारखान्याने दाखल केलेली याचिकेवरची सुनावणी हायकोर्टाने पुढे ढकलून २० तारीख दिली आहे. चिमणी पाडकामाला स्थगिती दिली नाही. त्यामुळे महापालिका कारवाई करू शकते आणि ती निश्चित करेल, असे संजय थोबडे यांनी सांगितले.

# किती खपवून घ्यायचे?

एकेकाळी भारतीय राजकारणात राजकिय पक्षांमध्ये एक कडक शिस्त होती. पक्षाध्यक्षांनी आदेश दिला की, दिल्लीपासून ते गल्लीपर्यंतचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते कामाला लागायचे. हे काम करत असताना बंड अथवा फितुरी बिलकूल नसायची. पक्षश्रेष्ठींचा तो एक दबदबा असायचा. आम्ही पक्षाचे सच्चे पाईक आहोत, या निष्ठेने पक्षाचे काम चालायचे. विशेष करून काँग्रेस आणि भाजपा या दोन राष्ट्रीय पक्षांमध्ये ही शिस्त पहायला मिळायची पण आज ही शिस्तच मोडून पडली आहे. कुणीही उठतो, बंडाची भाषा करायला लागतो.आपल्याला जे हवे तेही बंडोबा मंडळी आपल्या पदरात पाडून घेत असतात. ही प्रवृत्ती बोकाळल्याने आणि हायकमांडचे नियंत्रण राहिले नसल्याने प्रत्येक राजकिय पक्षात बंडोबांचा सुळसुळाट वाढत चालला आहे. राजस्थानमध्ये पुन्हा बंडाचे निशाण फडकावले गेले. काँग्रेसचे नाराज नेते आणि राजस्थानचे माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट हे ११ जून रोजी नवा राजकिय पक्ष स्थापन करणार असल्याचे सांगण्यात आले. ४५ वर्षीय सचिन पायलट यांनी या विषयावर अधिकृत भाष्य केले नसले तरी त्यांचे समर्थक नव्या पक्ष स्थापनेच्या बातम्यांना बिनबुडाचे असल्याचे सांगत आहेत. मात्र, पूर्वानुभव पाहाता पायलट हे स्वस्थ बसतील असे वाटत नाही. त्यांची राजकिय महत्त्वाकांक्षा काँग्रेसला नेहमीच नडू लागली आहे. त्यांना मुख्यमंत्री व्हायचे आहे पण ते स्वप्न सत्यात उतरत नाहीय म्हटल्यानंतर पायलट यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत चालला आहे. राहुल आणि प्रियांका यांनी मध्यस्थी करून पायलट यांची समजूत एकदा काढली पण पायलट यांचा तोच तोच धिंगाणा पहायला मिळत आहे. एक सिनीअर आणि निष्ठावंत नेता म्हणून पक्षाने अशोक गेहलोत यांना मुख्यमंत्रिपदाची संधी दिली.पक्षाचा आदेश मान्य करण्याऐवजी पायलट हे पक्षालाच आव्हान देत सुटले आहेत. मागच्या वर्षभरापासून पायलट-गेहलोत यांच्यात शीतयुद्ध सुरू आहे. पायलट यांनी यावर्षी ११ एप्रिल आणि ११ मे अशा दोन दिवशी अशोक गेहलोत यांच्याविरोधात आघाडी उघडली होती. काँग्रेसने मात्र पायलट यांची भूमिका पक्षविरोधी आणि पक्षाच्या विचारधारेविरोधात असल्याचे वारंवार म्हटले आहे. वसुंधरा राजे यांचे सरकार असताना राज्यात मोठा भ्रष्टाचार झाला असून त्याची चौकशी



करण्यात यावी, अशी मागणी पायलट यांनी उपोषणाच्या माध्यमातून केली होती. गेहलोत यांचे नेते काँग्रेस नसून भाजपा नेत्या वसुंधराराजे ह्या आहेत, असा आरोप पायलट यांच्याकडून होत आहे. भ्रष्टाचाराचा विरोध करत युवकांपर्यंत पोहोचण्यासाठी पायलट यांनी तीन मागण्या समोर ठेवल्या आहेत. एक म्हणजे भ्रष्टाचाराने बरबटलेल्या राजस्थान लोकसेवा आयोगाला बरखास्त करावे आणि नव्या कायद्याद्वारे आयोगाची पुनर्स्थापना करावी आणि पेपरफुटी प्रकरणामुळे ज्या लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान झाले, त्यांना भरपाई मिळवून द्यावी. तसेच वसुंधरा राजे यांच्या कार्यकाळात झालेल्या भ्रष्टाचार प्रकरणांची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करावी तसेच या तीन मागण्या मे महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण न झाल्यास त्यांच्याकडून राज्यव्यापी आंदोलन हाती घेण्यात येईल, अशी घोषणा त्यांनी जयपूर येथील सभेत केली. जून २०२० मध्ये पायलट यांनी गेहलोत यांच्याविरोधात आघाडी उघडली होती. त्यावेळी अशीही चर्चा होती की, काँग्रेसचे काही आमदार राज्यसभेच्या निवडणुकीत विरोधात मत देऊ शकतात. पण तसे झाले नाही आणि काँग्रेसचा दुसरा उमेदवारही राज्यसभेवर निवडून गेला. या निवडणुकीच्या एक महिना आधी पायलट यांचे समर्थक आमदार ११ जून रोजी बंडखोरी करतील, असे सांगितले जात होते. पायलट त्यावेळी राजस्थानचे उपमुख्यमंत्री होते. तथापि गेहलोत यांना या राजकारणाचा थांगपत्ता लागला आणि त्यांनी १० जून रोजीच आपली सूत्रे फिरवली. सर्वात आधी सत्ताधारी पक्षाच्या सर्व आमदारांना मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी बैठकीसाठी बोलावण्यात आले. निवासस्थानी पोहोचल्यानंतर सर्व आमदारांना एक बसमध्ये बसवून शिव विला रिसॉर्टवर नेण्यात आले. मुख्यमंत्र्यांच्या या खेळीमुळे अनेक आमदारांना धक्का बसला. मुख्यमंत्र्यांच्या या डावपेचामुळे अनेक आमदार फुटण्यापासून वाचले. तसेच मुख्यमंत्री गेहलोत यांच्याच ताब्यात राज्याचे गृहखाते होते. त्यांनी कोरोना महामारीचे कारण पुढे करून राज्याच्या सीमा बंद केल्या. गेहलोत यांनी घेतलेल्या खबरदारीच्या उपायांमुळे राजस्थानमधील काँग्रेसचे सरकार वाचले. त्यानंतर गेहलोत यांनी पायलट यांच्यावर थेटपणे कधीही हल्ला केला नाही. पायलट यांचे पक्षासाठी योगदान काय? केवळ वडील राजेश पायलट यांचीच पुण्याई. सचिन यांचे आता अति झाले. त्यांचा छडा लावण्याची वेळ आलीय. पक्षशिस्त महत्त्वाची आहे.

सामाजिक

# दि डायरी ऑफ वेस्ट बंगाल

१९८९ मध्ये काश्मीर घाटीतील हिंदू पंडितांची घरे, जमिनी, शेती, प्रॉपर्टी यावर कब्जा करण्यासाठी ज्या प्रकारे हिंदू पंडितांचा नरसंहार करण्यात आला आणि त्यांना पळवून लावण्यात आले ते आपण दि काश्मीर फाईल चित्रपटात पाहिले आहे. केरळमधील महाविद्यालयीन जीवनातील तरुणींना धर्मांतरण ट्रॅपमध्ये अडकवून त्यांना सिरीया, यमन अशा देशांमध्ये नेऊन अय्याशी करण्यासाठी ज्या प्रकारे आतंकवाद्यांना विकलं गेलं ते आपण दि केरळ स्टोरी या चित्रपटामध्ये पाहिले आहे. आता १४ ऑगस्टला एक चित्रपट येतोय 'दि डायरी ऑफ वेस्ट बंगाल' ! भारतातील पश्चिम बंगाल एक असं राज्य की एकेकाळी त्याला 'भारताचे मँचेस्टर' म्हणून ओळखले जायचे. अनेक विद्वान आणि महान व्यक्तींनी या पश्चिम बंगालमध्ये जन्म घेतला आणि देशाचे नाव उज्वल केले. भारतातील बरेचसे नागरिक नोकरीच्या उपलब्धतेमुळे पश्चिम बंगालमध्ये जाणे पसंत करत होते परंतु हेच पश्चिम बंगाल आज ममता दादींच्या दादागिरीमुळे, हुकूमशाहीमुळे धार्मिक प्रयोगशाळा झाल्याचे दिसून येत आहे.

सध्याची तिथली परिस्थिती पाहता तिथे लोकशाही अस्तित्वात आहे असं आपण म्हणू शकणार नाही. ममता दीदी तिथल्या हिंदूंसाठी एक खतरनाक चेहरा म्हणून सिद्ध झालेली आहे. सत्तेच्या मोहमायेत अडकलेल्या ममतांना ते स्वतः एक हिंदू स्त्री आहेत याचा विसर पडलेला दिसून येत आहे. चित्रपटाचे निर्माते वसीम रिजवी जे की आधी मुसलमान होते आणि नंतर त्यांनी हिंदू धर्माचा अभ्यास करून हिंदू धर्म स्वीकारला आणि ते आता जितेंद्र नारायण सिंग त्यागी म्हणून ओळखले जातात. त्यांनी या चित्रपटाची निर्मिती केलेली आहे. या चित्रपटाचे बरेचसे सीन्स हे पश्चिम बंगालमध्ये शूट करण्यात आलेले आहेत. चित्रपटात असा दावा करण्यात आलेला आहे की, सत्तेच्या हव्यासापोटी किंवा मुस्लिम वोट बँकेसाठी किंवा




मुस्लिम मतांची संख्या वाढण्यासाठी अवैधपणे, सरकारी आशीर्वादाने बांगलादेशातून येणाऱ्या रोहिंग्या मुसलमानांना तिथे सहारा देण्यात येत आहे. तिथे या संघटित रोहिंग्या मुसलमानांकडून तिथल्या स्थानिक हिंदूवर होणारे अन्याय अत्याचाराकडे ममता दीदी संपूर्णपणे दुर्लक्ष करत आहेत. हिंदूवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात राज्य सरकारकडून कोणतीही कृती केली जात नाही. कारवाई करण्यासाठी गेलेल्या सीबीआयला रातोरात अटक केली जाते. कारण ममता सरकारची एक काळी बाजू अशी आहे की, तिथे जर बहुमत मुसलमानांचं ममता दीदीला असेल तर तिथे शरीयत कायदा चालतो म्हणे..!

बांगलादेशातून रोहिंग्या मुसलमान सर्वप्रथम पश्चिम बंगाल सरकारच्या आशीर्वादाने पश्चिम बंगालमध्ये येतो आणि तिथून भारतातल्या विविध राज्यांमध्ये तो आपले वसाहती निर्माण करतो उगीच भारताची लोकसंख्या जगात सर्वाधिक झालेली नाही. बांगलादेश आणि पाकिस्तानातून भारतात येण्यासाठी इच्छुक असणाऱ्या मुस्लिमांना सर्वात सुपीक मार्ग जर कोणता असेल तर ते पश्चिम बंगाल आहे. मागच्या पाच सहा महिन्याखाली रामनवमीच्या शोभायात्रेवरती दिल्लीमध्ये जी दगडफेक करण्यात आलेली होती ते रोहिंग्या मुसलमानच होते? बांगलादेशातून रोहिंग्या मुसलमान भारतात आले कसे? देशाची राजधानी दिल्लीत त्यांनी आपल्या वसाहती कसे निर्माण केले? तिथली आम आदमी पार्टी काय करत आहे? पश्चिम बंगालमध्ये बांगलादेशातून येणारे रोहिंग्या मुसलमानांना सरकारी आशीर्वादाने पश्चिम बंगालमध्ये सहारा देण्यात येत आहे, राहण्यासाठी आसरा दिला जात आहे परंतु पाकिस्तानच्या छळाला कंटाळून जे हिंदू पाकिस्तानातून, बांगलादेशातून पश्चिम बंगालमध्ये आलेले आहेत, त्यांची घरे उध्वस्त केली जात आहेत म्हणजे हिंदुस्थानातील हिंदूंच्या विरोधात सर्व घडत आहे आणि जे रोहिंग्या मुसलमान तिथे दुसऱ्या देशातून येऊन हिंदूंसोबत दादागिरी करत आहेत. त्यांना मारहाण करत आहेत..त्या राज्यातून निघून जाण्यासाठी धमक्या देत आहेत त्यांना ममता दीदींच्या सरकारचा पूर्ण सपोर्ट आहे. आता विचार करा तुम्ही फक्त..!

तिथे सध्या पश्चिम बंगालमध्ये जे मुसलमान आहेत ते तर ममता दीदींच्या तृणमूल काँग्रेस पार्टीला पूर्ण बहुमत देतातच परंतु बांगलादेशातून आपल्या पश्चिम बंगाल राज्यामध्ये तिथल्या राज्य सरकारी आशीर्वादाने आलेल्या या रोहिंग्या मुसलमानांना देखील तेथील संघटित मुस्लिम समुदाय, संघटना कायद्याचा गैरवापर करून खोटे आधार कार्ड, मतदान कार्ड, रेशन कार्ड बनवून देत आहेत, त्यांना राहण्यासाठी टेन्ट बांधून दिले जात आहेत. जेणेकरून ममतादीदींची मुस्लिम वोटर संख्या वाढली पाहिजे तसेच या रोहिंग्या मुसलमानांची सर्व मते तिथल्या मुसलमानांसोबतच ममता दीदींना मिळायला पाहिजे याची प्रति पाच वर्षाला काळजी घेतली जात आहे. बांगलादेशातून आलेले रोहिंग्या मुसलमान आपल्या पश्चिम बंगाल राज्यात येऊन आपल्याच हिंदूंना जर धमक्या देत असतील तर राज्य आणि केंद्र सरकार याकडे डोळेझाक कशी काय करू शकते? चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये असा दावा करण्यात आलेला आहे की- पश्चिम बंगालमध्ये एका गावामध्ये हिंदूंची २०० घरे जाळण्यात आली पण प्रेसला त्या घटनेची साधी बातमीसुद्धा पोहोचता कामा नये याची पुरेपूर काळजी घेतली गेली. तिथे पलायनामुळे हिंदूंची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे आणि तेथील मुसलमान आणि रोहिंग्या मुसलमान यांची संख्या वाढत आहे म्हणजेच पश्चिम बंगाल आता दुसरे काश्मीर होण्यास फार वेळ लागणार नाही असा दावा चित्रपटात करण्यात आलेला आहे. चित्रपटांमधून एकच सामायिक संदेश देण्यात आलेला आहे की आपल्या देशावर संघटित विशिष्ट समुदायाची दुष्ट नजर आहे, त्यांचा उद्देश स्पष्ट आहे की ते या देशात सरकारी आशीर्वादाने सर्वप्रथ आपण जातपात बाजूला ठेवून सर्वप्रथम हिंदू आहोत हे ध्यानीमनी ठेवून भारतमातेच्या छत्रछायेखाली आपल्याला एकत्रित येणे गरजेचे आहे.

**- चिदानंद चाबुकस्वार,सोलापूर**

टुडेज् ब्लॉग

# समाज कधी शहाणा होणार?

**छत्रपती शाहू महाराजांची नगरी म्हणजे कोल्हापूर. अंबाबाईची नगरी म्हणजे कोल्हापूर. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानात सर्वात जास्त ज्यांचे विचार आले ते म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज. ज्या कोल्हापूरच्या नगरीत भारतातील सर्वात जास्त शाळा बांधल्या गेल्या. विविध जातिधर्माच्या लोकांसाठी हॉस्टेल्स बांधले गेले. ती पहिली भूमी होती जिथे बहुजनांना पूजा करण्याचे अधिकार देण्यात आले. त्याच्यासाठी वैदिक विद्यालय उघडण्यात आलं. भारतात त्याकाळी सर्वात पुरोगामी राज्य म्हणून हे ओळखलं जायचं.**

१९२० च्या माणगाव परिषदेत म्हणाले की, 'मागासवर्गीयांना त्यांचा नेता मिळाला. बाजूला डॉ. बाबासाहेब आंबेडकर उभे होते. त्या कोल्हापुरात आता जे काही झालं, ते अत्यंत दु:खदायक आहे. आपण संख्येने अधिक आहोत. म्हणून अल्पसंख्यांकांना कधीही मारू शकतो हा विचार अंगावर शहारे आणतो. कोणीही बोलायचे नाही अस म्हटलं तर मग ज्या तत्त्वांवर आपण जगतो आहोत त्या तत्त्वांशी गद्दारी करीत आहोत असे होते. दरवेळेस मतांचे राजकारण, दरवेळेस जातीचे राजकारण, दरवेळेस धर्माचे राजकारण करताना माझा धर्म, माझी जात



याच्यापलीकडे बघायचंच नाही असं जर ठरवलं. तर मला वाटते की, 'ज्या विचारांवर महाराष्ट्र उभा आहे; त्या विचारांचाच पराभव आहे.'


प्रत्येक राजकारण्यांनी जर ठरवलं, 'महाराष्ट्रात कुठेच कोल्हापूरसारखी परिस्थिती होऊ द्यायची नाही तर ते अशक्यही नाही. पण केवळ मतांचे राजकारण करीत सत्तेत कोण जात आहे? आणि सत्तेत कसे जाणार? यावर जर आपण विचार करीत बसलो तर एखाद्या जंगलामध्ये वणवा पेटावा तसे या महाराष्ट्रात होईल आणि जसे जंगलातील प्राणी पळतात तशी माणसे पळताना दिसतील. आपल्याला काय हवं, हे त्या जनतेने आणि नेत्यांनी ठरवावं. पण पुरोगामी महाराष्ट्राची विचारधारा ह्याला जर आपण चिकटून राहिलो आणि कुठल्याही परिस्थितीत समोर शंभर जण आहेत आणि बाजूला एक जण आहे आणि त्या एकावर अन्याय, अत्याचार होतोय; तर त्या एकाच्या बाजूने उभे राहिलो तरी भीती वाटता कामा नये इतका धीटपणा या मातीने आपल्याला शिकवला आहे. तो आता उघडपणाने दाखवावा लागेल अन्यथा वैचारिक गदारोळात हा महाराष्ट्र बेचिराख होईल. निवडणुका कोण जिंकेल? सत्तेत कोण येईल? याची मला तरी काही काळजी नाही. मला महाराष्ट्राची नक्कीच काळजी आहे. त्यामुळे जे काही वातावरण महाराष्ट्रात सध्या आहे ते काही बरे नाही. झालेल्या घटनेबद्दल मनापासून दु:ख होत आहे.

अंबाबाईच्या मंदिराजवळ बाबूजमाल नावाचा दर्गाह आहे. देशातील तसेच महाराष्ट्रातील किती जणांना माहिती आहे की, या दर्ग्याच्या प्रवेश द्वारावरच गणपती बसवलेला आहे. असे हे आगळे-वेगळे कोल्हापूर. कोणीतरी एक व्यक्ती स्टेट्स लावतो आणि आपण सगळ्यांनाच बडवायला सुरू करतो. स्टेटस लावणारा देखील वेडा आणि त्याला मारणारे देखील वेडे. पण समाज कधी शहाणा होणार ?

**- डॉ. जितेंद्र आव्हाड.**

जन्म हा अखेरचा

# प्राणानुग्रहस्थल - १



त्याप्रमाणे महाशिवरात्रीला जशी भगवान शिवाची पूजा करतात, तशी एरव्ही करत नाहीत. वर्षातून एकदाच करायची असते. त्या दिवशी लक्षावधी माणसे दर्शनासाठी जमलेली असतात. गर्दीत तासन्तास उभे राहून इतरांचे धक्केबुक्के सहन करीत दर्शन झाले, न झाले, अशा परिस्थितीत आपण दर्शन घेत असतो. त्यात कष्ट अधिक आहेत.

ज्योतिर्लिंगाच्या रुपात जसा परमेश्वर बाहेर आहे तसाच अंतर्लिंगाच्या रुपाने आत देखील आहे. मूलाधारात, हृदयात आणि भ्रूमध्यात ज्योतिर्लिंग विद्यमान आहे, असे 'सिद्धांतशिखामणी' मध्ये म्हटले आहे. डोळे बंद केल्यावरच या ज्योतिर्लिंगाचे दर्शन होते. प्राणायामाच्या सहाय्याने मूलाधार, हृदय, भ्रूमध्य या तीन स्थानांची शुद्धीही करावी लागते.

वर्षभर आपले घर बंद असते. मग त्यात किती केरकचरा साठला असेल? व्यापारी आपले दुकान रोज थोडे झाडून काढतो आणि वर्षातून एकदा दिवाळीच्या वेळी पूर्ण स्वच्छ करून त्याला रंग देऊन नवेपणा आणतो. दुकानाची आणि घराची काळीजी जेवढी घेतो, त्याच्या शतांशानेही मन स्वच्छ करण्याची खबरदारी घेत नाही. त्यामुळे मन स्वच्छ करण्यासाठी वर्षानुवर्षे लागतात. म्हणून रोज घरासारखे मनदेखील स्वचछ करीत गेले पाहिजे.

आपल्या देहात ती षट्चक्रे आहेत ती परमात्मदर्शनाची मुख्य स्थाने मानली जातात. काशी, केदार, रामेश्वर आदी ठिकाणी दर्शनासाठी जावे असे का बरे म्हटले जाते? तर ती स्थाने पवित्र असतात आणि असंख्य लोकांनी तेथे बसून भवच्चिंतन केलेले असते. परमेश्वर सर्वत्र व्यापून आहे. तो अणु-परमाणूंत भरलेला आहे. तरीही त्याचे विशेष प्रकटन काशी-केदार-रामेश्वरादी पवित्र स्थानी झालेले असते. म्हणून तीर्थस्थाने दर्शनिय, वंदनिय असतात. त्याचप्रमाणे अंतरंगातील ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेण्यासाठी मूलाधार, हृदय आणि भ्रूमध्य ही तीन स्थाने पवित्र मानली जातात.

मन आणि प्राण यांच्या संयोगाने अंतर्लिंगाचे दर्शन घेता येते. मनाला बाहेर जाण्यासाठी प्राणाचे साहाय्य लागते तसेच अंतर्मुख होण्यासाठी देखील प्राणाचेच साहाय्य घ्यावे लागते. अंधाऱ्या गुहेत प्रवेश करताना हाती दिवा घ्यावा लागतो, त्याप्रमाणे अंतरंगात जाताना प्राणाचा दिवा न्यावा लागतो. जेव्हा श्वासोच्छ्वास दीर्घ होईल, तेवढा अंतरंगातला प्रवेश सोपा होतो.

**(क्रमशः) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# उत्तम दान : नेत्रदान दिन

आज १० जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो. अनेक अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करणारे सुप्रसिद्ध नेत्र विशारद डॉ. रामचंद्र लक्ष्मण भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ १० जून हा दिवस जागतिक नेत्रदान दिन म्हणून साजरा केला जातो.

डोळ्यात दाटलेल्या काळ्याकुट्ट अंधारातून उद्याच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या व्यक्तींना नेत्रदानाच्या माध्यमातून हे जग सुंदर आहे याची प्रचिती देण्याची प्रेरणा हा दिवस आहे. शासकीय सेवेत नेत्रचिकित्सक म्हणून अहोरात्र झटणाऱ्या डॉ भालचंद्र यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात अजरामर आहे. त्यांचा जन्म उस्मानाबाद जिल्ह्यात १० जून १९२४ रोजी झाला. घरची परिस्थिती हलाखीची असूनही जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी शिक्षण पूर्ण करून नेत्र विशारद पदवी मिळवून ८० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या. १० जून १९७९ ला त्यांचे निधन झाले. या दिवसाचे औचित्य साधून लोकांमध्ये नेत्रदानाविषयी जनजागृती करून लोकांना मृत्यूनंतर डोळे दान करण्यास प्रवृत्त करणे हे या दिवसाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे.

आपल्या आयुष्यात डोळ्यांचे किती महत्व आहे हे आपण जाणतोच. जगातील सर्व सुंदर गोष्टी आणि सुंदर जगाचा आनंद आपण डोळ्यांमुळेच घेऊ शकतो. डोळ्यांशिवाय जगण्याची कल्पनाही कोणी करू शकत नाही. डोळे हे आपल्या शरीरातील सर्वात महत्वाचे ज्ञानेंद्रिय आहे. डोळ्यांद्वारे आपल्याला ७५ टक्के ज्ञान मिळते. सध्याचा काळात बदलणारी जीवनशैली, अनियमित दिनचर्या, प्रदूषण आणि वाढलेला मानसिक तणाव यामुळे बहुतेक लोकांना डोळ्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. काहींना हा त्रास लहानवयातच होतो तर काहींना वयाच्या मध्यकाळात होतो. काही असेही दुर्दैवी असतात की ज्यांच्या आयुष्यात कायमचा अंधार असतो. त्यांना दृष्टीच नसते, जन्मतःच ते दृष्टिहीन असतात. तर काही जण अपघातात आपले डोळे गमावतात. जगभरात दृष्टिहीन लोकांची संख्या जास्त आहे. अशा अंधारलेल्या लोकांच्या आयुष्यात नेत्रदानाने प्रकाश आणता येतो. त्यासाठी नेत्रदानाचे महत्व लक्षात घेऊन जग न पाहिलेल्या व्यक्तींना नेत्रदान करुन त्यांना हे सुंदर जग पाहण्याची संधी देणे ही काळाची गरज आहे.

एका मृत्यू झालेल्या व्यक्तींचे डोळे एका नेत्रहीन व्यक्तीला देण्यात येते. त्यामुळे त्या अंध व्यक्तीचे जीवन तर प्रकाशमान होतेच पण मृत व्यक्ती मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहू शकते. आज जागतिक नेत्रदानाच्या दिवशी नेत्रदानाचा संकल्प करूया, मृत्यूनंतरही हे सुंदर जग पाहूया.

**- श्याम ठाणेदार, पुणे.**

# कला शाखेतील करिअरच्या संधी

**इयत्ता १२ वी पास झालेल्या सर्वांचे अभिनंदन....साहजिकच विद्यार्थी व पालक यांच्यासमोर उभे राहणारा प्रश्न म्हणजे की १२ नंतर काय करायचे? खरे तर १२ वी नंतर विद्यार्थी वर्गाला अनेक पर्याय उपलब्ध आहेत त्यातला एक पर्याय म्हणजे कला शाखा...**


खरे तर आजकाल कला शाखा शिकून काय उपयोग असा प्रश्न अनेकजण विचारताना दिसतात त्या अनुषंगाने काही प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न केलेला आहे. मुळातच कला शाखा यांच्याकडे आजकाल पाहण्याच्या दृष्टीकोन हा ट्रेन्डप्रमाणे बदललेला आहे हे मान्य करूनच बाकीच्या शाखा ही या अवस्थेतून गेलेल्या आहेत हेही ध्यानात घेतले पाहिजे. १९९५ ते २००५ पर्यंत कॉमर्स शखेची अस्वस्था अतिशय भयावह होती तीच नंतर सायन्स शाखेकडे आली. आता सद्या कला शाखेची अवस्था तशी आहे पण तरीही या शाखेत अनेक पर्याय उपलब्ध आहेत.

मुळातच याला जबाबदार कोण यापेक्षा हे का होते आहे हे पाहणे महत्वाचे आहे. एकदा ट्रेन्ड आला की पालक आणि विद्यार्थी त्याकडे धाव घेताना दिसतात. त्यामुळे अशा शाखेकडे गर्दी होताना दिसते आहे. हे मान्य करूनही कला शाखेकडे विद्यार्थ्यांना अनेक संधी उपलब्ध आहे. याचाही विचार पालकांनी करायला पाहिजे आहे.

बी. ए. अभ्यासक्रम त्यामध्ये एमपीएससी, यूपीएससीचा या परीक्षा, बँक, सीआरपीएफ, आर्मी भरती, पोलीस दलातील विविध पदे, विक्रीकर अधिकारी अशा अनेक शासकीय सेवांच्या परीक्षा देता येतात किंवा त्याचा अभ्यास करून विद्यार्थी यशस्वी होताना दिसतात. या शाखेत शिकत असताना त्यांना भाषिक एक अभ्यास करावा लागत तसेच स्पर्धा परीक्षेच्या दृष्टिकोनातून सर्व विषयांची तयारी होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना एक प्रकारचे सामाजिक भान अधिक दिसून येते. कारण सामाजिक शास्त्राचा एकत्रित अभ्यास करत असल्यामुळे समाजातील आर्थिक, सामाजिक, राजकिय आणि इतर समस्यांची जाण निर्माण होते व ते सोडविण्यासाठी अधिक जागृत होतात. यामुळे उत्तम नागरिक म्हणून समाजात वावरताना दिसतात. समाजकारणात, राजकारणात असे विद्यार्थी पुढे असतात.

कला विविध शास्त्रांचा अभ्यासामुळे विद्यार्थ्यांमध्ये अनेक गुण विकसित होतात. बीएची डिग्री घेत असताना ते संगणक अकौंट अशा प्रकारचे कोर्से स करू शकतात. त्या कौशल्याच्या आधारे स्वतः चा व्यवसाय रोजगार उपलब्ध होऊ शकतो. उत्तम संभाषण कौशल्ये, स्टेज डेरिंग, वक्तृत्व, निर्णय निर्धारण क्षमता, इवेन्ट मेनेजमेन्ट अशा अनेक व्यक्तिमत्व विकासातल्या गोष्टी कला शाखेतून आत्मसात करता येतात. ज्यामुळे आज सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातही मोठ्या संधी निमाण झालेल्या आहेत. आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे कला शाखेतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी कमी खर्च येतो. प्रवेश फी कमी असते. सरकारकडून अनेक प्रकारच्या शिष्यवृत्ती मिळतात. त्यामुळे चांगला करियर बनविता येतो. कला शाखेतल्या संधी -

१. डीएड, बीएड, एमएएड करून शिक्षण क्षेत्रात शिक्षक म्हणून संधी मिळते आहे आणि येणाऱ्या पुढील काळात शिक्षण क्षेत्रात अनेक संधी आहेत. कारण सद्या या शाखेकडे गर्दी कमी आहे. त्यामुळे मागणी जास्त व पुरवठा कमी अशी अवस्था निर्माण झालेली आहे. २. बीएसडब्लू, एमएसडब्ल्यू करता येते. यामधून सामाजिक क्षेत्रात कार्य करता येते. ३. बीए किंवा एमए, एलएलबी करून वकिली व्यवसाय करता येतो. ४. एलएलएम, डीएलएमडी ती एलसारखे कोर्स करून उतम करियरची संधी उपलब्ध होते. ५. फॅशन डिझायनिग, इंटर्रीयर डिझायनिंग, ॲनिमेशनसारखे कोर्स करुन स्वत:चे व्यवसाय उभे करता येतात. ६. एमबीए करून मार्केटिंग क्षेत्रात आपले नाव निर्माण करता येतात. ७. फॉरेन भाषा कोर्सेस करून त्या संधी मिळतात. ८. उत्तम संभाषण कौशल्ये मिळाल्यामुळे कॉल सेंटरवर जॉब मिळू शकतो. ९. बीपीएड, एमपीएड करून फिजिकल शिक्षकी नोकरी मिळू शकते किंवा विविध खेळांचे स्वत:चे प्रशिक्षण वर्ग सुरु करता येतात. १०. मास कम्युनिकेशन किंवा पत्रकारिता यासारखे कोर्स करून पत्रकारिता वार्ताहर, टीव्ही रिपोर्टर, न्यूज ॲन्कर, न्यूज पोर्टल, रेडीओ जाकी, बातमीदार अशा अनेक संधी मिळू शकतात.



११. ग्रंथालय पदविका करून ग्रंथपाल किंवा तत्सम नोकरी मिळविता येते. १२. जाहिरात क्षेत्रात विविध कोर्स करून खूप मोठ्या संधी मिळवू शकतात. १३. ग्राफिक डिझायनिंग करून हजारो रुपये मिळवू शकतात. १४ हॉटेल व्यवस्थापन करून नोकरी किंवा स्वत:चा व्यवसाय उभा करू शकतात. १५. संगीत, चित्रकला, ललितकला, नृत्यदिग्दर्शन, नाट्य अशा अनेक क्षेत्रात आपले उत्तम करियर करता येऊ शकते. १६. भाषांचा साहित्यांचा अभ्यास करून निवेदक, सूत्रसंचालक, प्रभावी वक्ता होऊन आपले करियर घडविता येते. १७. लेखक, कवी, संवादक, दुभाषा, अनुवादक होऊ शकता. त्याच्या कार्यशाळा आयोजित करून उतम करियर निर्माण करता येते. १८. राजकिय समीक्षक किंवा अभ्यासक, निवडणूक व्यवस्थापक याही संधी उपलब्ध होतात. १९. पर्यटन क्षेत्रात उत्तम गाईड, सहल नियोजक याही क्षेत्रात आपले उत्तम करियर करता येऊ शकते.

**- डॉ. विश्वनाथ आवड, अकलूज.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## अठरा वर्षीय युवकाने घरातील अँगलला केबलच्या सहाय्याने घेतला गळफास

✔ **सोलापूर** : अठरा वर्षीय युवकाने घरातील अँगलला केबलच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील तळे हिप्परगा येथे गुरुवारी सायंकाळी घडली. समर्थ अंकुश पाटोळे ( वय १८, रा. तळे हिप्परगा ) असे त्या मयत युवकाचे नाव आहे.मृत समर्थ याने गुरुवारी दुपारी राहत्या घरात अँगलला गळफास घेतला असल्याचे कुटुंबियांना लक्षात आले. त्याला नातेवाईकांनी गळफासावरून खाली उतरवून बेशुध्द अवस्थेत छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात उपचाराकरिता दाखल केले असता डॉक्टरने त्यास मृत घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## लघु पाटबंधारे परिसरात आढळला अनोळखी मृतदेह

✔ **सोलापूर** : होटगी येथील लघू पाटबंधारे परिसरात शुक्रवारी सकाळी एका अनोळखी फिरस्त्याचा मृतदेह आढळून आला. त्याच्या जवळ काही चिल्लर रक्कम आढळली. तर त्याच्या शरीराचा काही भाग हिंस्र प्राण्याने खाल्लेला होता. दरम्यान, वळसंग पोलिसांनी त्याला छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले. शुक्रवारी सकाळच्या सुमारास घटनास्थळी घाण वास येत असल्याने काही नागरिकांनी पाहणी केल्यानंतर त्यांना एका इसमाचा मृतदेह परिसरात आढळला. यामुळे नागरिकांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिली. घटनेचा माहिती कळताच वळसंगचे ए. एस. आय. राजशेखर निंबाळे, पोलिस नाईक बाबा मुल्ला हे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी रुग्णसेवक लादेनच्या मदतीने त्या इसमाला छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात दाखल केले. दरम्यान, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. त्याच्या शरीराचा काही भाग हिंस्र पाण्याने खाल्ला होता. यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली होती. तो साधारणता तीन ते चार दिवसांपूर्वी पासून मरून पडल्याचा अंदाज पोलिसांकडून लावण्यात येत आहे. दरम्यान, त्याच्याकडे काही चिल्लर रक्कम सापडली असून त्याची ओळख पटवण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.

## अक्कलकोट येथे भरदिवसा १ लाखांची पळवली रोकड

✔ **सोलापूर** : रोख रकमेची पिशवी दुचाकीला अडकावून दुकानदाराची बोलत असताना चोरट्याने १ लाख रुपये रोख आणि मोबाईल असलेली पिशवी शिताफीने पळवली . ही चोरी अक्कलकोट येथील एवन चौकात गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली. यासंदर्भात चंद्रकांत महादेव हाके (वय ६५ रा.समता नगर अक्कलकोट) यांनी अक्कलकोट उत्तर पोलिसात फिर्याद दाखल केली. काल दुपारी १२ वाजेच्या सुमारास त्यांनी पिशवी सहीत दुचाकी रस्त्यावर उभी करून एवन चौकातील कारीमुंगी यांच्या तेलाच्या दुकानात गेले होते. दुकानदारांसोबत बोलत असताना चोरट्याने दुचाकीच्या पिशवीतील रोख रक्कम आणि मोबाईल घेऊन पसार झाला. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार चिंचोळकर पुढील तपास करीत आहेत.

## संतनाथ साखर कारखान्यातून दीड लाखांचे साहित्य पळविले

✔ **वैराग** : कारखान्याच्या आवारातील खोलीचे कुलूप तोडून चोरट्याने विद्युत मोटारी, इलेक्ट्रॉनिक बॅटऱ्या आणि इतर साहित्य असा १ लाख ४० हजाराचा माल पळविला. ही चोरी तुळशीदासनगर येथील संतनाथ साखर कारखान्यात मंगळवारी पहाटेच्या सुमारास घडली. यासंदर्भात कारखान्याचे ओंकार विठ्ठल सोनलकर (रा.बार्शी) यांनी वैराग पोलिसात फिर्याद दाखल केली . सोमवार रात्री ते मंगळवारी पहाटेच्या सुमारास चोरट्यानी कारखान्याच्या आवारातील खोलीचे कुलूप तोडून आत प्रवेश केले . आणि २ विद्युत मोटारी,६ इलेक्ट्रॉनिक बॅटऱ्या आणि इतर लोखंडी साहित्य चोरून नेले . असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे . सहाय्यक फौजदार हळे पूढील तपास करीत आहेत .

## दरवाजाचे कुलूप तोडून साहित्य चोरले

✔ **सोलापूर** : घराच्या दरवाज्याचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत घरातील तांब्याच्या दोन घागरीसह २२ हजारांचे साहित्य चोरले. ही घटना रविंद्र तुकाराम हंचाटे ( वय ६६, रा. मेहता नगर, दहिटणे रोड) यांच्या घरी घडली. याबाबत हंचाटे यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.फिर्यादी हंचाटे यांच्या घराच्या मेनगेटचे कुलूप तोडून चोराने घरात प्रवेश करत तांब्याच्या घागरी, तांब्याचा हंडा, एक लहान तांब्या, चांदीच्या दोन आरत्या, कलश, चांदीची सटवाई व सोन्याची अंगठीसह एकूण २१ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल चोरला. ही घटना ७ जून रोजी घडली. याप्रकरणी अज्ञात चोरावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पवार करत आहेत.

## कस्तुरबा मार्केट येथे मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

✔ **सोलापूर** : सोलापुरात येत्या ११ जून रोजी कस्तुरबा मार्केट येथील सच्चिदानंद वाचनालय येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती पत्रकार परिषदेत जवाहर जाजू यांनी दिली. मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधीचे प्रमुख मंगेश चिमटे यांच्या वाढदिवसानिमित्त हे शिबिर घेण्यात येणार आहे. याचा सर्व जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा अस आवाहन करण्यात आलं. याप्रसंगी जवाहरलाल जाजू मित्र परिवाराचे गिरीश जखोटिया, गोकुळ झंवर, प्रवीण चंडक आदी उपस्थित होते. सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत हे शिबिर होणार आहे.

# आषाढी एकादशीला मुख्यमंत्र्यांच्या शासकीय महापूजेनंतर कोणत्याही व्हीआयपीला दर्शन नाही

### राज्य सरकारच्या धाडसी निर्णयाचे वारकरी संप्रदायातून जोरदार स्वागत



✔ सुराज्य/सोलापूर

**आषाढी एकादशीला येणाऱ्या लाखो भाविकांसाठी शिंदे-फडणवीस सरकारने खुशखबर दिली आहे. आषाढी एकादशीला पहाटे होणाऱ्या मुख्यमंत्र्यांच्या शासकीय महापूजेनंतर कोणत्याही व्हीआयपीला दर्शन दिले जाणार नाही असं राज्य सरकारकडून जाहीर करण्यात आलं आहे.तसेच दर्शन पासवरही मर्यादा आणण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्याची माहिती पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.**

विठ्ठल भक्तांसाठी आषाढी एकादशी हा सोहळ्यातील पर्वणीच दिवस असतो. यादिवशी दर्शन मिळावे यासाठी ३०-३० तास भाविक दर्शन रांगेत उभारलेले असतात. त्याचवेळी राज्यभरातील आमदार, खासदार, मंत्री, अधिकारी आणि त्यांचे कार्यकर्ते व्हीआयपी बनून दर्शन घेण्यासाठी गर्दी करीत असतात. त्यामुळे रांगेतील शेकडो भाविकांना या पवित्र दिवशी दर्शनापासून मुकावे लागते. याबाबत मुख्यमंत्री शिंदे सरकारने एक धाडसी निर्णय घेत आषाढी एकादशीला मुख्यमंत्र्यांच्याशासकीय महापूजेनंतर कोणत्याही व्हीआयपीला दर्शनाला सोडले जाणार नसल्याचा निर्णय घेतला आहे.

राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी हा निर्णय जाहीर केल्याने आषाढी एकादशीला केवळ दर्शन रांगेतील भाविकांनाच देवाचे दर्शन घेता येणार आहे. याचसोबत आषाढी एकादशीला मानाच्या दिंड्यांचे देण्यात येणाऱ्या दर्शन पासेसशिवाय कोणतेही व्हीआयपी दर्शन पासेस वितरित करू दिले जाणार नसल्याचेही विखे पाटील यांनी सांगितले आहे. यामुळे दर्शन रांगेत उभ्या राहणाऱ्या भाविकांना पहाटेची शासकीय महापूजा संपल्यानंतर दिवसभर विठुरायाचे दर्शन पर्वणी काळात घेता येणार आहे.

राज्य सरकारच्या या निर्णयाचे वारकरी संप्रदायातून जोरदार स्वागत होत आहे. आषाढी यात्रेला आलेल्या जास्तीत जास्त भाविकांना एकादशी दिवशी दर्शन देण्यासाठी झालेला हा निर्णय यात्रेच्या इतिहासात पहिल्यांदाच घेण्यात आला आहे. यामुळे एकादशी दिवशी दिवसभर दर्शनासाठी घुसखोरी करणाऱ्या तथाकथित राजकारण्यांना मात्र चांगलाच चाप बसणार आहे. आषाढी एकादशीला व्हीआयपी बंदीची संपूर्ण व्यवस्था पोलिसांच्या ताब्यात दिली जाणार असल्याने मंदिर प्रशासन देखील यात हस्तक्षेप करू शकणार नाही.

## वडिलांच्या निधनानंतर जन्मदात्या आईस लाकडाने मारहाण

✔ सुराज्य/बार्शी

वडिलांच्या निधनानंतर तू मला माझी जमीन वाटून कां देत नाहीस म्हणून मुलानेच दारूच्या नशेत जन्मदात्या आईलाच शिविगाळ करून लाकडाने मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली.

ही घटना बार्शी तालुक्यातील उपळाई टोंगे येथे ५ रोजी होऊन याबाबत जखमी आई पद्मिनी दशरथ चेके वय हिने ६ रोजी तालुका पोलीसात मुलगा शंभू दशरथ चेके याच्या विरुद्ध तक्रार देताच त्याच्या विरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे. यातील फिर्यादी महिलेचे पती ११ महिन्यांपूर्वी मयत झालेले आहेत त्यानंतर जखमी आई ही मुलगा त्याच्या मुला मुलीसह गावी एकत्रित रहात आहेत.

यातील फिर्यादी आई ही परांडा तालुक्यातील वाकडी येथिल तिची मुलगी पुष्पा हिच्याकडून ५ रोजी गावी आली होती. त्यावेळी मारणारा तिचा मुलगा घरासमोर रडत असल्याने आईने का रडतोस विचारताच त्याने तू येथे का आलीस येथे यायचे नाही असे म्हणून त्याने शिविगाळ केल्याने तू शिव्या का देतोस असे विचारताच त्याने मला जमीन वाटून का देत नाहीस असे म्हणून खाली पडलेल्या लाकडाने सर्व अंगावर व पोटरीवरही मारहाण करून जखमी केले .त्यावेळी एकाने येऊन सोडविले व गावातील एका पिकप मधून येथील दवाखाण्यात दाखल केले

## भाजपाकडून बार्शी बाजार समितीचे सभापती रणवीर राऊत यांच्यावर मोठी जबाबदारी

### बार्शी विधानसभा मतदारसंघ निवडणूक प्रमुख म्हणून नियुक्ती

✔ सुराज्य/बार्शी



भारतीय जनता पक्षाने आमदार राजेंद्र राऊत यांचे पुत्र रणवीर राऊत यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे. भाजपकडून महाराष्ट्रातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक प्रमुखांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये २४६ बार्शी विभानसभेसाठी निवडणूक प्रमुख म्हणून बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रणवीर राऊत यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

रणवीर राऊत यांनी विदयार्थी दशेपासूनच आपल्यातील नेतृत्वगुणांची चमक दाखविली आहे. महाविदयालयीन जीवनात सलग तीन वर्ष यु.आर म्हणून काम पाहताना विदयार्थ्यांचे प्रश्न हाताळले. त्यानंतर बार्शी बाजार समितीला विक्रमी मतांनी निवडून आल्यानंतर बार्शी बाजार समितीचे सभापतीपद ते सध्या भूषवत आहेत. २०१९ च्या विधानसभेप्रसंगीही बार्शी विधानसभा मतदारसंघातील युवकांच्या सातत्याने संपर्कात राहून युवकांची फळी त्यांनी मजबूत केली होती. पदाच्या माध्यमातून काम करत असताना तालुक्यात त्यांचा चांगला जनसंपर्क वाढला आहे.

बार्शी शहरासह ग्रामीण भागातील युवकांच्या ते थेट संपर्कात असतात. एवढेच नाही तर पक्ष व गटाच्या जेष्ठ मंडळींच्याही ते संपर्कात असतात. मतदारसंघातील पक्षाचे कार्यकर्ते, जेष्ठ नेतेमंडळी यांच्या कार्यक्रमांना आमदार राऊत यांना कार्यबाहुल्यामुळे जाणे शक्य नसल्यास तेथे सभापती रणवीर राऊत उपस्थिती लावतात. यातून त्यांचा मतदारसंघातील जनतेशी संपर्क वाढला आहे. त्यांचे संघटनकौशल्य लक्षात घेवून भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही जबाबदारी सोपवल्याचे मानले जात आहे.

सर्व विधानसभा निवडणुक प्रमुख त्यांच्या अनुभव व संघटनकौशल्याच्या बळावर संघटन बळकट करून २०२४ च्या विधानसभा निवडणूकीत भाजपा शिवसेना युतीला विजय मिळवून देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे भाजपाने सोपवलेली ही जबाबदारी ते कशी पेलतात हे पाहणे औत्सुक्याचे आहे.

> भारतीय जनता पार्टीने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून युवकांचे संघटन आणखी बळकट करून सन २०२४ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणूकीत बार्शी मतदारसंघात आम्ही पुन्हा विजय मिळवून पक्षाचा विश्वास सार्थ ठरवेन.
>
> **- रणवीर राऊत,(सभापती, बाजार समिती, बार्शी)**

## समाजमंदिराचे होणार आता अभ्यासिका केंद्र

### अक्कलकोट पंचायत समितीचा नाविन्यपूर्ण उपक्रम

✔ सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट पंचायत समिती यांच्या सेस निधीमधून तालुक्यातील १२ ग्रामपंचायतींना अनुसूचित जाती व नवबौध्द घटकासाठी बांधलेल्या समाज मंदिरांमध्ये आता अभ्यासिका केंद्र सुरू करण्यात येणार असल्याचे बीडीओ सचिन खुडे यांनी सांगितले.

ग्रामीण भागात विशेष करून अनुसूचित जाती व नवबौध्द युवकांना स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी तसेच अभ्यास करणे सोयीचे व्हावे म्हणून आता गावोगावी बांधण्यात आलेल्या समाज मंदिराचे रुपांतर आता अभ्यासिका केंद्रात रुपांतर होणार आहे.

ग्रामीण भागातील जास्तीत जास्त युवक वर्ग स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून शासकिय सेवेत दाखल व्हावेत या उद्देशाने ग्रामीण भागात अभ्यासिका केंद्र सुरू करण्याचा उपक्रम पंचायत समिती प्रशासनाने हाती घेतला आहे.

या उपक्रमांतर्गत पंचायत समिती चे सेस निधीमधून २० टक्के राखीव असलेल्या समाज कल्याण विभागाच्या निधी अंतर्गत ग्रामपंचायत मध्ये असणाऱ्या विशेष करून अनुसूचित जातीचे लोक वस्तीमध्ये असलेल्या समाज मंदिरासाठी पुस्तक ठेवण्यासाठी कपाट, टेबल, खुर्ची आणि स्पर्धा परीक्षा करिता आवश्यक पुस्तकांचा संच देण्याची तरतूद ही करण्यात आल्याचे बीडीओ सचिन खुडे यांनी सांगितले.

निधी प्राप्त होताच संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक यांना सदर साहित्य शिवस्वराज्य दिनाचे औचित्य साधून वाटप करण्यात आल्याचे सांगितले. साहित्य घेताना संबंधित सरपंच यांनी समाधान व्यक्त केले. ग्रामीण भागातील तरुणांना यातून नक्कीच प्रेरणा मिळून ग्रामीण युवक नक्कीच स्पर्धा परीक्षेच्या अभ्यास करुन यशस्वी होतील अशी भावना व्यक्त केल्या.या नाविन्यपूर्ण उपक्रमांबद्दल सर्व सरपंचानी गट विकास अधिकारी सचिन खुडे यांचे विशेष आभार मानले.



## गुणात्मक विकासाबरोबर स्पर्धात्मक विकास साधावा : पाटील

✔ सुराज्य/अक्कलकोट

आजचा विध्यार्थी गुणात्मक विकासाबरोबर स्पर्धात्मक विकास साधावा, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ पुणे विभागीय कार्यवाहक विलास पाटील यांनी नागणसुर येथील एच, जी, प्रचंडे माध्य. व उच्च माध्यमिक प्रशालेतील १० वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी केली.

कार्यक्रम च्या अध्यक्ष स्थानी स्कूल कमिटीचे चेअरमन श्रीमंत कळसगोंडा होते. याप्रसंगी व्यासपीठावर रमेश तोळनुरे, काशिनाथ पोतदार, ओंकार गंगोंडा,मांडोळप्पा पत्तार, प्राचार्य सिध्दाराम सोलापुरे, प्रा इराणा धानशेट्टी आदी मान्यवर उपस्थित होते. प्रशालेचा निकाल ९८,०९% लागला असून १०५ पैकी१०२ विध्यार्थी उत्तीर्ण झाले. यांपैकी४२विध्यार्थी विशेष प्राविण्य, ४०विध्यार्थी प्रथम श्रेणी, १५ विध्यार्थी दितीय श्रेणी,०६ विद्यार्थी पास क्लास,०२ अनुत्तीर्ण, मराठी माध्यमातून कु,भुवनेश्वरी रामकोरे ९५,८०% प्रथम, कुमार धर्मराज गंगोंडा,९३,६०%,प्राजक्ता खिलारी ९३,६०% दिवतीय, कुं,लक्समीनागलगाव९३,२०% तृतीय तर कन्नड माध्यमातून कुं,ज्योती यंबतनाल ९३,२०% प्रथम, कुं,धानामा पुजारी ८८,४०% द्रितीय, कु,साक्षी नाटिकर८४,८०%तृतीय असे यशाचे मानकरी आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजयकुमार गंगदे ,बसवराज धानशेट्टी, सुनीता बंदीछोडे, प्रमिला शिवगुंडे, विश्वनाथ तळवार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वनाथ वाघमोडे यांनी केली.

## सोलापूरच्या हातमागावरील छबी अभिनेते बाळकृष्ण यांना भेट

✔ सुराज्य/सोलापूर

आंध्र प्रदेशातील राजमंड्री येथे झालेल्या तेलुगू देशम पक्षाच्या अधिवेशनात सोलापूरच्या हातमागावर तयार झालेली छबी नंदमुरी बाळकृष्ण यांना भेट म्हणून देण्यात आली. दिवंगत मुख्यमंत्री, पक्षाचे संस्थापक तथा तेलुगु चित्रसृष्टीतील गाजलेले अभिनेते स्व. एन. टी. रामाराव यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या चाहत्यांचा यावेळी गौरव करण्यात आला.



या समन्मानाला उत्तर देताना, सोलापूरच्या चाहत्यांनी बाळकृष्ण यांची प्रतिमा दिली.

ते एनटीआर यांचे पुत्र आहेत. पक्षाचे विद्यमान आमदारही आहेत. तेलुगू सिनेसृष्टीत त्यांनीही स्वत:ला सिद्ध केले. पक्षात सक्रिय झाले. त्यांच्यामुळे पक्षात चैतन्य निर्माण झाल्याच्या भावना सोलापूरचे कार्यकर्ते तिपण्णा गणेरी यांनी मांडल्या.

बाळकृष्ण यांची प्रतिमा 'अखंडा' या सिनेमातील आहे.

त्यातील एका प्रसंगात त्यांचे उग्ररूप दिसते. ती हुबेहुब विणल्याचे गौरवोद्गार बाळकृष्ण यांनी काढले. यावेळी आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू उपस्थित होते. अधिवेशनासाठी सोलापुरातून श्रीनिवास गोसकी, रामुल पोतू. श्रीनिवास गणेरी, तिपण्णा गणेरी, तिपण्णा चिनराज, प्रशांत गणेरी, द्यावरकोंडा आदी गेले होते एनटीआरचे चाहते आणि कार्यकर्ते म्हणून उपस्थित होत.

## खेडगी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. शिवराया चन्नप्पा आडवीतोट



✔ **अक्कलकोट** : अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी संचलित सी.बी.खेडगी बसवेश्वर सायन्स, राजा विजयसिंह कॉमर्स आणि राजा जयसिंह आर्ट्स महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी डॉ.शिवराया आडवीतोट यांची निवड झाली असून ते या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. १९८८ पासून भूगोल विभागात अध्यापनाचे काम करत आहेत. त्यांची एकूण ३५ वर्षाची सेवा ही विषयाच्या व संस्थेच्या विकासाकरता महत्वपूर्ण ठरली आहे. विषयाच्या अध्यापनाबरोबरच पंधरा वर्षे राष्ट्रीय छात्र सेना कॅप्टनच्या पदावर कार्यरत असताना त्यांचे अनेक विद्यार्थी आज देशाच्या विविध क्षेत्रात उत्तमपणे कार्य करीत आहेत. संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी, सचिव सुभाष धरणे , व्हाईस चेअरमन अशोक हारकुड व सर्व संचालक मंडळ व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## ऑर्किडचे डॉ. सोनगे यांना जलशुध्दीकरणाचा पेटंट मंजूर

✔ सुराज्य/सोलापूर

एन.के. ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, सोलापूरचे प्र. प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे यांना भारतीय बौध्दीक संपदा विभागाकडून जलशुध्दीकरणातला पेटंट मंजूर करण्यात आला.

समुद्राचे,बोअरवेलचे आणि विविध आस्थापनतील सांडपाणी पिण्यायोग्य नसते तसेच आर. ओ. प्लांटमधून साधारणत: ७०७ अशुध्द पाणी निघते. असे अशुध्द पाणी शुध्द करण्याचे तंत्रज्ञान डॉ. सोनगे यांनी महाविद्यालयातील प्रयोगशाळेत विकसित केले. या तंत्रज्ञानास प्युरीफिकेशन ऑफ इंपोटेबल ॲण्ड वेस्ट वॉटर' या नावाने पेटंट मंजूर झाले.

कुठलेही अशुध्द पाणी न उकळता, सौरऊर्जा, उष्णता व उर्जेचा उपलब्ध स्रोत आणि इतर वाया जाणारी औष्णीक उर्जा वापरून पाणी शुध्द करता येते हे प्रयोगाअंती सिध्द केले.

जगातील काही भागामध्ये भुगर्भीय पाण्यामध्ये अतिक्षारयुक्त, विषारी घटक व जड धातूचे प्रमाण जास्त असते असे पाणी पिल्यामुळे माणसाचे आणि प्राण्यांचे आरोग्य बिघडून त्यांचे जिणे हे अतिजिकिरीचे बनते तसेच समुद्रकिनाऱ्यावरील लोकांना व जहाजावरील लोकांना मुबलक प्रमाणात



क्षारयुक्त पाणी उपलब्ध असूनही ते पाणी पिता येत नाही. अशा ठिकाणी सदरच्या तंत्रज्ञानाची उपयुक्तता अधिक आहे.

काही भागामध्ये पाण्याचे दुर्भिक्ष आहे. अशा ठिकाणी तयार होणाऱ्या सांडपाण्याचा पूणर्वापर फार गरजेचे असते. अशा ठिकाणी सुध्दा सदरचे तंत्रज्ञान वापरून सांडपाणी पिण्यायोग्य बनवता येते.

शुध्द पाण्यासाठी, भुगर्भातून पाणी उपसा करून आर.ओ. सयंत्रामधून शुध्द केल्यामुळे ७०७ पाणी हे सांडपाणी म्हणून फेकून दिले जाते आणि यामुळे पर्यावरणाची हानी होते. या संशोधनामुळे पर्यावरणाची हानी काही प्रमाणात थांबणार आहे.

हे संशोधन पूर्ण करण्यासाठी एन.के. ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे व्यवस्थापन, प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, डसॉल्ट सिस्टम व सिध्दराज कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.

**अक्कलकोट नगरपरिषद अक्कलकोट**

**जाहीर लिलाव**

जा.क्र.२०२३/न.प.अ.कोट/बांध.११/संकलन-१/आरआर-/कावि-४१९

दि.०६/०६/२०२३

याद्वारे सर्व सेवाभावी संस्था व संबंधित सर्व मक्तेदारांना कळविण्यात येते की, अक्कलकोट नगरपरिषद हद्दीतील अक्कलकोट नगरपरिषदेच्या मालकीचे तारामाता बाग देखभाल दुरूस्तीसाठी खाजगी व्यक्तीस पैसे द्या व वापरा तत्त्वावर चालविणेस देणेत येणार आहे. याकरिता सदर कामाचा जाहीर लिलाव दि.२०/०६/२०२३ रोजी सायं.४.०० वा. नगरपरिषद कार्यालयात मा.मुख्याधिकारी नगरपरिषद अक्कलकोट यांचे दालनात ठेवणेत आलेला आहे. तरी ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे त्यांनी इसारा रक्कम रू.१०००/- दि.२०/०६/२०२३ रोजी दु.२.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात लेखा विभागात रोखीने भरून लिलावात भाग घेणेचे आहे. इसारा रक्कम न भरलेल्या अथवा मुदतीनंतर येणाऱ्या व्यक्तींना लिलावात भाग घेता येणार नाही. कामासंबंधी आवश्यक असणारी नोंदणीबाबतची व अनुभवाची सर्व कागदपत्रे लिलावावेळी समक्ष सादर करणेची आहेत. कागदपत्रे सादर केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. याबाबतचे सर्व शर्ती अटी नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. तसेच लिलावावेळी समक्ष वाचून दाखविणेत येतील.

**सही/-**
**(सचिन पाटील)**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**नगरपरिषद अक्कलकोट**



## प्रा. गढवाल यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन

**सोलापूर :** एस. एस. ए. आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजमधील ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. ए. ए. गढवाल लिखित इंडस्ट्रियल सोशॉलॉजी आणि सोशॉलॉजी ऑफ टेक्सटाईल इंडस्ट्री या दोन पुस्तकाचे प्रकाशन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सन्माननीय कुलगुरू डॉ.आर. के.कामत यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

औद्योगिक संस्था मानव संसाधन कामगार कायदे, कामगार संघटना, जड उद्योगांचे विकेंद्रीकरण, व्यवसाय वाद, सेवा व्यवसाय, पांढरपेशी व्यवसाय यासारख्या मुद्द्यांची मांडणी डॉ.गढवाल यांनी आपल्या पुस्तकात केलेली आहे, असे मत कुलगुरू डॉ.आर.के. कामत यांनी दोन्ही पुस्तकांच्या आशयाला अनुसरून व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आय. जे. तांबोळी होते व्यासपीठावर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे व्यवस्थापन सदस्य डॉ.देवानंद चिलवंत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.जे.के मुल्ला यांनी केले, प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ.शफी चोबदर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन राजगुरू यांनी तर आभार डॉ. दीपक नारायणकर यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



## काळूबाळूवाडी येथील शेतकऱ्याच्या कुटुंबियांना मदतीचा धनादेश

**सांगोला :** काळू बाळू वाडी ता. सांगोला येथील अंगावर वीज पडून मृत पावलेले भगवान शामराव व्हनमाने यांच्या वारस पत्नी श्रीमती शालन भगवान व्हनमाने यांना महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांच्याकडील नैसर्गिक आपत्तीतून शासकिय मदतीचा सुमारे ४ लाख रुपयेचा धनादेश आमदार शहाजी बापू पाटील व तहसीलदार संजय खडतरे यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला.

काळूबाळू वाडी ता सांगोला येथील मेंढपाळ पशुपालक भगवान शामराव व्हनमाने -४५ हा शेळ्या- मेंढ्या चरण्यासाठी कांबळे वस्ती नजीक ओढ्याच्या परिसरात घेवून गेला होता रविवार ४ जून०२३ रोजी सायंकाळी ५ च्या सुमारास वादळी वाऱ्यामुळे पावसात अंगावर वीज पडून भगवान व्हनमाने यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता तर याचवेळी कळपातील शेळीच्या अंगावर विज पडून तिचाही मृत्यू झाला होता घटनेनंतर तलाठी साईनाथ रामोड यांनी मृताचा पंचनामा करून अहवाल शासकिय मदतीसाठी सांगोला तहसील कार्यालयाकडे सादर केला होता त्यानुसार काल शुक्रवारी आमदार शहाजी बापू पाटील व तहसीलदार संजय खडतरे यांच्या हस्ते मृताची वारस पत्नी श्रीमती शालन भगवान व्हनमाने यांना सुमारे ४ लाख रुपयेच्या शासकिय मदतीच्या सानुग्रह अनुदानाचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी पंचायत समितीचे माजी सदस्य सुभाष इंगोले, नारायण पाटील, युवा सेना तालुकाप्रमुख दीपक( गुंडा ) खटकाळे आरपीआयचे तालुकाध्यक्ष खंडू सातपुते, सोमनाथ मरगर आदी उपस्थित होते. केवळ सहा दिवसातच आ.पाटील यांनी मृताच्या वारसाला शासकिय आपत्तीतून ४ लाख रुपये मदत देवून कुटुंबाला आधार दिला आहे.

## संभाजीराव शिंदे प्रशालेचा दहावीचा ९६ टक्के निकाल

**सोलापूर :** संभाजीराव शिंदे प्रशाला, जुनी मिल कंपाऊंड, मुरारजी पेठ, सोलापूर या प्रशालेचा दहावीचा निकाल ९६.१२ टक्के लागला आहे. प्रशालेतील प्रथम क्रमांक वैष्णवी राजू सुरवसे ८९.२० टक्के, द्वितीय क्रमांक अंकिता अमरसिंग राजपूत ८७.२० टक्के, तृतीय क्रमांक समृद्धी दयानंद खताळ ८५.२० टक्के गुण मिळाले असून प्रशालेतील २१ विद्यार्थी विशेष प्रावीण्य ५३ विद्यार्थी प्रथम श्रेणी ४० विद्यार्थी, द्वितीय श्रेणी १० विद्यार्थी पास श्रेणी घेऊन यशस्वी झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव महेश कोठे, अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे, उपाध्यक्ष देवेंद्र कोठे, खजिनदार प्रथमेश कोठे, विश्वस्त डॉ. राधिका चिलका, मुख्याध्यापक नागेशकुमार काटकर, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका राजश्री नारायणकर, शिक्षकवृंद शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## व्यसनमुक्ती केंद्रामध्ये पर्यावरण दिन साजरा

**सोलापूर :** नेहरु युवा केंद्र संचलित व्यसनमुक्ती मानसोपचार केंद्रामध्ये ५ जून पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. जयश्री मेहता व रोहिणी पावडशेट्टी उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस दोन्ही प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. नंतर पर्यावरणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. पर्यावरणाचे संतुलन राखले तरच भावी आयुष्य येणाऱ्या पिढीसाठी चांगले असेल नाही तर निसर्गाचा ऱ्हास होईल व भविष्यात सामना करावा लागेल, असे डॉ. जयश्री मेहता यांनी व्यक्त केले तसेच प्रा. रोहिणी पावडशेट्टी यांनी आपले विचार व्यक्त करताना झाडे लावणे व त्याचे संवर्धन करणे आवश्यक आहे. तसेच प्लास्टिकचा वापर कमी करणे, पाण्याचा वापर योग्य प्रमाणात करावा तरच निसर्गाचे संवर्धन होण्यास मदत होईल.

## किरण सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्षपदी कांबळे

**सोलापूर :** दि किरण सहकारी गृहनिर्माण संस्थेची सभा ५ जून २०२३ रोजी सायं. ५ वाजता संस्थेच्या कार्यालयात संपन्न झाली. यात सर्वानुमते संस्थेच्या चेअरमनपदी प्रेमचंद विठ्ठल कांबळे व सचिवपदी ज्ञानेश्वर तुकाराम कांबळे यांची पुढील पाच वर्षाकरिता निवड करण्यात आली. या सभेस संस्थेचे कार्यकारी मंडळाचे किरण डोलारे, मऱ्यावा धेबडे, सुनील भालेराव, सज्जनबाई निकंबे, शिलादेवी भालेराव, महानंदा जगदाने उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अनंता कोरे यांनी काम पाहिले. शेवटी आभार विश्वस्त किरण डोलारे यांनी मानले.

## समिक्षा आवटे हिचे यश

**सोलापूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा २०२३ मध्ये समिक्षा श्रीधर आवटे या विद्यार्थिनीने इंग्रजी माध्यमातून ९५.४० टक्के गुण मिळवून यशस्वी झाली आहे. तिचे वडील श्रीधर आमसिध्द आवटे हे पुणे येथे सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून कार्यरत असून आई या गृहिणी आहेत. सोलापूर येथील मनपा प्राथमिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष आमसिध्द आवटे यांची समिक्षा नात आहे. तिच्या यशाबद्दल सर्वांकडून अभिनंदन केले जात आहे.

# नई जिंदगी परिसरात अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची मोठी कारवाई

## सुमारे ४० अनधिकृत पत्रा शेड केले जमीनदोस्त

**सुराज्य/सोलापूर**

**सोलापूर महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने शहरातील विविध ठिकाणी अतिक्रमण हटाव मोहीम मोठ्या प्रमाणात सातत्याने सुरू आहे. दरम्यान, आज नई जिंदगी परिसरात या विभागाने तब्बल पाच तास मोठ्या प्रमाणात कारवाई केली. जेसीबीच्या साह्याने दुकानासमोरील सुमारे ४० अनधिकृत पत्रा शेड उध्वस्त करण्यात आले.**

महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांच्या माध्यमातून गेल्या पंधरा दिवसापासून नियमितपणे अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात येत आहे. सोलापूर शहरातील विविध चौक, बाजारपेठा या ठिकाणी रस्तावर रहदारीस अडथळा येईल अशा पद्धतीने करण्यात आलेले अतिक्रमण या पथकाकडून काढण्यात येत आहे. तसेच जप्तीची ही कारवाई करण्यात येत आहे. सोलापूर शहरातील विविध ठिकाणी यापूर्वीच नियमितपणे ही कारवाई करण्यात आली.

दरम्यान, आज शुक्रवारी सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत गजबजलेल्या नई जिंदगी परिसरात अतिक्रमण प्रतिबंधक पथकाने मोठ्या




प्रमाणात कारवाई केली. पोलीस बंदोबस्तात ही कारवाई हाती घेण्यात आली. जेसीबीच्या साह्याने दुकानासमोरील सुमारे ३० ते ४० अनधिकृत पत्रा शेड निष्काशीत करण्यात आले. त्याचबरोबर दुकानासमोर केलेले कट्टे, काँक्रिट स्लोप हेही काढण्यात आले.

या कारवाईमुळे परिसरातील विक्रेते व व्यापाऱ्यांमध्ये चांगलीच धावपळ उडाली. यावेळी चार चाकी दोन गाड्या आणि इतर किरकोळ सामान जप्त करण्यात आले असल्याची माहिती अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी दिली.

सोलापूर शहरातील नागरिक व विक्रेत्यांनी रस्त्यावर रहदारीस अडथळा येईल अशा प्रकारे कोठेही अतिक्रमण करू नये. शहरात अतिक्रमण हटाव मोहीम महापालिका प्रशासनाकडून नियमितपणे सुरू ठेवण्यात येणार आहे. स्वच्छ सोलापूर - सुंदर सोलापूर राहण्यासाठी सर्वांनी महापालिका प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन अतिक्रमण प्रतिबंधक विभाग प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी केले आहे.

## नंदमुरी बालकृष्णा यांच्या वाढदिवसानिमित्त अन्नदान कार्यक्रम

**सोलापूर :** नंदमुरी बालकृष्णा अभिमान संघमच्यावतीने आ.नंदमुरी बालकृष्णा यांची ६३ व्या वाढदिवसानिमित्त शनिवारी अन्नदान कार्यक्रम सोलापूर शहर एनबीके अध्यक्ष जर्नादन इंजामुरे, श्रीनिवास लकशेट्टी, रवि चिट्टीपल्ली, कॉ. नरसय्या आडम (मास्तर), माजी महापौर महेश कोठे, सुरेश फलमारी, विनायक कोंडयाल, रामचंद्र जन्नु, पांडुरंग दिडी, मल्लिकार्जुन कमटम, बालराज बोल्ली, तिपण्णा गणेरी, देविदास गुंडेटी, श्रीपाद चिंता, श्रीनिवास कोंडा, नारायण गजेली यांच्या उपस्थितीत सदर कार्यक्रम संपन्न होणार आहे.

# महिलांनी सावित्रीबाई फुले, जिजाऊ यांचा आदर्श ठेवावा : कडूबाई खरात

## भीम गीतांच्या कार्यक्रमास रसिकांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद

**सुराज्य/सोलापूर**

आर. एस. मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्या वर्धापन दिनानिमीत्त रवींद्र सरवदे व मित्र परिवाराकडून घेण्यात आलेल्या गायिका कडूबाई खरात यांच्या भीम गीतांच्या कार्यक्रमास मोठा प्रतिसाद मिळाला. बुधवारी रात्री बुधवार पेठेतील आंबेडकर उद्यानात हा सोहळा पार पडला. महिला, तरूणी यांना सावित्रीबाई फुले, माँ जिजाऊ यांचा आदर्श ठेवा. जीवनात यशस्वी व्हा, शिक्षण घ्या असा सल्ला त्यांना दिला.



होता तो आमचा बाप... बांबाच्या, उपकरांची ठेवूनीया जाण..... काय सांगू मी भीमाची कहाणी... आई बापाहून भीमाची लई उपकार हाय.... तुम्ही खाता त्या भाकरीवर बाबासाहेबांची सही हाय र.... अशी एकापेक्षा एक सरस भीमगीते सादर करून ख्यातनाम गायिका कडूबाई खरात यानी उपस्थित श्रोत्यांची वाहवा मिळवली. उपस्थित तरूणांना, शाळकरी मुलांना त्यांनी शिकून संघटीत होऊन संघर्ष करण्याचा असा सल्लाही दिला. अतिशय बहारदार गीत गायनाच्या कार्यक्रमात श्रोत्यांची मोठी गर्दी जमली होती. रवींद्र सरवदे यांनी कार्यक्रमाचे नेटके नियोजन केले होते. या कार्यक्रमाला सी.ए.धीरज जवळकर, नगरसेवक नारायण बनसोडे, महादेव बाबरे,पिंटू ढावरे,अश्विन शिंदे,पिंटू साबळे, सुधाकर गुंडेली, मदन वडावराव,संदीप दुगाणे, समीर नदाफ, रोहित जगताप, सागर बाबरे,प्रविण कांबळे,धम्मा मैंदर्गीकर, गुड्डू तळभंडारे, भीमा इंगळे, रवीश राडिया, विशाल कणसे, मल्लू शिवशरण,संतोष कदम,अलीम आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हर्षवर्धन बाबरे, सोनू इंगळे,अनिकेत जगताप, सौरभ इबतहल्ली, विवेक इंगळे, नितीन कांबळे, आदित्य बाबरे, सोहन सोनकांबळे, सोनू बाबरे, आयुष जगताप, रोहन कांबळे, नयन जगताप, शुभम इबतहल्ली, सौरभ डांगे, रोहन सोनकांबळे, विकी सिद्धगणेश, कनिष्क रणशृंगारे, आप्पा तळभंडारे, मोनू बाबरे आदींनी परिश्रम घेतले.

## तालवाद्यसम्राट अण्णा जोशी यांच्यावरील माहितीपट दाखविला जाणार

**सोलापूर :** सोलापुरात जन्मलेले पण नंतर आपल्या बोटांतल्या अद्भुत कौशल्यामुळे हिंदी /मराठी चित्रपट सृष्टीत अफाट कामगिरी केलेले कै भालचंद्र गोविंद उर्फ अण्णा जोशी हे पडद्यामागचे कलाकार होते. त्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाची ओळख सोलापुरातल्या बहुसंख्य लोकांना नाही. या श्रेष्ठ कलाकाराचा जीवनप्रवास आणि कलेच्या क्षेत्रातला थक्क करणारा प्रवास जाणकार रसिकांना माहीत व्हावा , या हेतूने सोलापुरातील ज्येष्ठ



रंगकर्मी आणि लेखक शिरीष देखणे यांनी 'तालवाद्यसम्राट अण्णा जोशी' या नावाचा माहितीपट (डॉक्युमेंटरी) तयार केला आहे. एका तासाचा कालावधी असलेल्या या माहितीपटाचा मोफत जाहीर 'शो ' हिराचंद नेमचंद वाचनालयातर्फे शनिवार दिनांक १० जून २०२३ रोजी सायंकाळी ६.०० वाजता लोकमान्य टिळक सभागृहात आयोजित केला आहे. रसिकांनी अवश्य उपस्थित राहावे. असे आवाहन प्रमुख कार्यवाह प्रा डॉ येळेगावकर यांनी केले आहे.

## आयुक्तांच्या स्वीय सहाय्यकाकडे लेखापरीक्षकपदाचा अतिरिक्त कार्यभार

**सुराज्य/सोलापूर**

महापालिका आयुक्तांचे स्वीय सहाय्यक राहुल कुलकर्णी यांच्याकडे आता अंतर्गत लेखापरीक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. तसे कार्यालयीन आदेश महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी काढले आहेत.



महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी हे आदेश नुकतेच काढले आहेत. कार्यालयीन आदेशाच्या दिनांकापासून स्वतः कडील पदाचे काम पाहून अंतर्गत लेखापरिक्षक या पदाचे काम पुढील आदेश होईपर्यंत पहावयाचे आहे, असे आयुक्तांनी आदेशात म्हटले आहे.

दरम्यान, यापूर्वी महापालिका मिळकत कर विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांच्याकडे अंतर्गत लेखापरीक्षक विभागाचा अतिरिक्त पदभार होता. आता त्यांच्या जागी राहुल कुलकर्णी यांच्याकडे ही अतिरिक्त जबाबदारी सोपवण्यात आली आहे. सोलापूर महापालिकेत सध्या मुख्य लेखापरीक्षक पदाची जबाबदारी रूपाली कोळी यांच्याकडे आहे तर मुख्य लेखापाल विभाग उपायुक्त विद्या पोळ या सांभाळत आहेत.

## 'होय, मी देव पाहिलाय' पुस्तकाचे शनिवारी शिवस्मारक येथे प्रकाशन

**सुराज्य/सोलापूर**

येथील से.नि. कार्यकारी अभियंता वसंत नाईकनवरे लिखित होय, मी देव पाहिलाय' या आत्मकथनाचे शनिवार, दि. १० जून २०२३ रोजी सकाळी ११ वाजता शिवस्मारक सभागृह, शिंदे चौक येथे प्रकाशन




होणार आहे. ज्येष्ठ पत्रकार व लेखक अरविंद जोशी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. जटायु अक्षरसेवा प्रकाशन संस्थेकडून ग्रंथ प्रकाशन होत असल्याचे जनसंपर्क अधिकारी सुजय निकते यांनी सांगितले. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांची उपस्थिती असणार आहे.

लेखक हे एका मागासवर्गीय कुटुंबात जन्माला आलेले. घायपातापासून दोरखंड वळून तयार करणे आणि शेतकऱ्यांना लागतील तसे ते पुरवून त्याच्या बदल्यात बलुते जमा करणे हे त्यांच्या कुटुंबाचे उपजीविकेचे साधन. या कुटुंबातील मुलाची यशाची कहाणी ही ग्रामीण भागातून आलेल्या, प्रतिकूल परिस्थितीशी झगडणाऱ्या प्रत्येकासाठी ऊर्जा देणारे पुस्तक बनले आहे. तरी या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभास उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## अ. भा. उर्दू शिक्षक संघा तर्फे यशस्वी विद्यार्थ्याचे सत्कार

**सुराज्य/सोलापूर**

अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघ महानगर पालिका च्या वतीने दहावीं व बारावीं परिक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार समारंभ सोशल महाविद्यालयच्या फंक्शन हाल मध्ये म .न. पा. शिक्षण मंडळ च्या उर्दू परिवेक्षक मा. निलोफर सय्यद यांच्या अध्यक्षतेखाली व संघ चे अध्यक्ष महिबुब तांबोळी , प्रा डॉ . जैनोद्दीन पटेल, उर्दू मराठी साहित्य परिषदचे अय्यूब नल्लामंदू, जुबेर हिप्परगी,




सय्यद इकबाल, अशफाक सातखेड यांच्या प्रमुख उपस्थित हा सत्कार समारंभ संपन्न झाला.

या वेळी जुनैद रियाज शेख, मो. उस्मान, फुरकानुलहक्क पानगल, अनम इरफान बेग, अय्यान सैफन पटेल, अमान अतीक काझी, मुनीब हसन, शरीफ हसन सिद्दीकी, अबदुल्ला मुजावर, काशीफा सुहेल शेख, फरहान सगीर शेख, उम्मे ऐमन शकील शेख, ऐमन अ सत्तार चौधरी या गुणवंत विद्यार्थ्याचा सत्कार प्रमुख पाहुण्याचे हस्ते करण्यात आला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक संघचे अध्यक्ष इमरान पठाण, जुनेद मणियार, नाजनीन कोरबू, अफरोज बागबान, अतीया बेग, जावीद लालकोट, शाहीन शेख, आफ्रीन दिंडोरे शफीक खान इ नी खुप परिश्रम घेतले.

# आषाढी वारी सुरू होण्यापूर्वी रस्ते सुस्थितीत करावेत

**सुराज्य/पंढरपूर**

आषाढी शुद्ध एकादशी सोहळा २९ जून २०२३ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासोबत मोठ्या संख्येने वारकरी भाविक येतात. त्यांची गैरसोय टाळण्यासाठी वारीपूर्वी वारी मार्गावरून पालखी तळावर जाणाऱ्या रस्त्यांची दुरुस्ती करून घ्यावी. आवश्यक ठिकाणी मुरुमीकरण करून घ्यावे. खड्डे भरून घ्यावेत. साईड पट्ट्याची कामे करून घ्यावीत, अशा सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री रविंद्र चव्हाण यांनी आज दिल्या.

मंत्री रविंद्र चव्हाण यांनी आज पंढरपूर आषाढी वारीच्या पार्श्वभूमिवर पालखीतळ व मार्गावरील रस्त्यांच्या सुस्थितीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी संबंधितांना सूचना केल्या. त्यांनी सोलापूर जिल्ह्यातील नातेपुते, वेळापूर येथील पालखीतळ तसेच पुरंदावडे येथील रिंगण व्यवस्थेची पाहणी केली.



यावेळी त्यांच्या समवेत आमदार राहुल कुल, मुख्य अभियंता अतुल चव्हाण, अधीक्षक अभियंता संजय माळी, माळशिरस पंचायत समितीचे माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील, कार्यकारी अभियंता अमित निमकर, सुनिता पाटील, नगरपंचायतचे मुख्याधिकारी माधव खांडेकर, यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पालखी मार्गावरुन पालखी तळांकडे जाणाऱ्या रस्त्यांची वारीपूर्वी दुरूस्ती करावी. आवश्यक ठिकाणच्या रस्त्यावर पथदिव्यांची व्यवस्था करावी. तसेच पालखी तळावर मुरूमीकरण, स्वच्छता, मुबलक पाणी पुरवठा, त्याचबरोबर आवश्यक ठिकाणच्या पालखी विसावा व तळाच्या कट्ट्यांची दुरुस्ती करावी, अशा सूचना त्यांनी यावेळी संबंधितांना दिल्या. मंत्री रविंद्र चव्हाण म्हणाले, पालखी मार्गावर व तळांवर उपलब्ध सोयी सुविधांचे सूचना फलक लावावेत. नवीन महामार्गांच्या कामांमुळे काही ठिकाणी पालखी मार्गात बदलाची शक्यता गृहित धरून दर्शनी भागात सूचना फलक लावावेत, अशा सूचनाही सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. चव्हाण यांनी यावेळी केल्या.



## अमोल किर्दक यांचा गरुड बंगला येथे सत्कार

**वेळापूर** : राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस माळशिरस तालुका अध्यक्षपदी अमोल उमेश किर्दक यांची निवड झाल्याबद्दल वेळापूर गरुड बंगला येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते तथा मार्केट कमिटी अकलूजचे नूतन संचालक उत्तमराव जानकर यांच्या हस्ते फेटा बांधून हार घालून पेढा भरवुन निवडीचे पत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, धानोरे माजी सरपंच जीवन जानकर, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे,ग्रामपंचायत सदस्य हनुमंत वायदंडे, नानासो मुंगुस्कर, तसेच मोहन कचरे, विनायक माने, माजी उपसरपंच जावेद मुलाणी,अमोल पनासे, जवान माने देशमुख, शंकर आडत, महादेव मेहत्रे, चंद्रकांत पोळ, बंडू घोरपडे,राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस सोलापूर जिल्हा अध्यक्ष सागर पडगळ, जिल्हा उपाध्यक्ष शुभम सोरटे, माजी तालुका अध्यक्ष अनिकेत काळे आदि. उपस्थित होते.



## उत्तर तालुका अध्यक्षपदी रेखा हजारे

**उ. सोलापूर** : उत्तर तालुक्यातील पाकनी येथील रेखा हणमंत हजारे यांची रयत क्रांती संघटनेच्या उत्तर तालुका महिला अध्यक्षपदी जिल्हाध्यक्ष अमोल वेदपाठक यांच्या उपस्थित निवड करण्यात आली. इतर पदाधिकारी पुढील प्रमाणे उपाध्यक्ष भाग्यश्री शंकर धपाटे,महिला जिल्हा कार्याध्यक्ष- तनुजा किशोर मुळे, महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष दीपक भोसले, ,सोलापूर जिल्हा अध्यक्ष नामदेव पवार अध्यक्षते खाली निवड करण्यात आल्या.यावेळी अक्कलकोट तालुका अध्यक्ष नागेश नायकोडी ,तालुका कार्याध्यक्ष रमेश भंगे ,पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस- हनुमंत गिरी, सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष- बाबासाहेब बोबडे,सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष- बाबासाहेब ननावरे, अक्कलकोट महिला तालुकाध्यक्ष- प्रियांका दोडळयो ,सोलापूर महिला जिल्हाध्यक्ष- तनुजा जवळे,महिला आघाडी युवा अध्यक्ष दक्षिण सोलापूर-- राणी होटकर तसेच दक्षिण सोलापूर- लक्ष्मण काका बिराजदार , अक्कलकोट तालुका सोशल मीडिया अध्यक्ष- तुषार भैय्या पाटील, दक्षिणा महिला तालुकाध्यक्ष- वैष्णवी लोहार यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## रिपाइंच्यावतीने महूद विकास सोसायटीच्या कार्यालयावर मोर्चा

**सांगोला** : महूद येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या मनमानी व भ्रष्ट कारभाराच्या विरोधात कारवाई करण्यात यावी. या मागणीसाठी सांगोला तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले) पक्षाच्या वतीने महूद विकास सोसायटीच्या कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे.

सांगोला तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले) पक्षाच्या वतीने सहकारी संस्थांचे सहाय्यक निबंधक,सांगोला यांना निवेदन देण्यात आले आहे.या निवेदनात म्हटले आहे की,महूद विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे चेअरमन व सचिव यांच्या भ्रष्ट व मनमानी कारभाराची चौकशी करण्यात यावी.अनुसूचित जाती व जमातींच्या शेतकऱ्यांना या विकास संस्थेचे सभासद करण्यासाठी टाळाटाळ केली जात आहे. महूद विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या वतीने महूद येथे उभारण्यात आलेल्या व्यापारीसंकुला मधील गाळे ठराविक लोकांनाच देण्यात आले आहेत. या गाळ्यांचा फेर लिलाव करण्यात यावा.या लिलावामध्ये अनुसूचित जाती व जमातींच्या शेतकऱ्यांसाठी राखीव गाळे ठेवण्यात यावेत.या मागणीसाठी सांगोला तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले)पक्षाच्या वतीने गुरुवार (ता.१५) रोजी महूद येथील विकास संस्थेच्या कार्यालयावर सकाळी ११ वाजता मोर्चा काढण्यात येणार असल्याचे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे तालुकाध्यक्ष खंडू सातपुते,सरचिटणीस सुरज होवाळ,युवकचे जिल्हाध्यक्ष नवनाथ सरतापे,बाबा सरतापे,महूद शहराध्यक्ष विशाल सरतापे, युवक तालुकाध्यक्ष सौदागर सावंत,विनोद उबाळे,स्वप्निल सावंत,दिगंबर गवळी, संजय करडे,दिगंबर सरतापे यांनी सांगितले.

## विभागस्तरीय महिला लोकशाही दिनाचे १२ जून रोजी आयोजन

**सोलापूर** : समस्याग्रस्त व पीडित महिलांच्या तक्रारींचे निवारण करुन त्यांना न्याय मिळावा यासाठी दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. जून महिन्याचा महिला लोकशाही दिन १२ जून रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे, असे महिला व बाल विकास विभागाचे उप आयुक्त संजय माने यांनी कळविले आहे. विभागस्तरीय महिला लोकशाही दिनाचे तक्रार अर्ज विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास, पोलीस आयुक्तालय शेजारी, ३, चर्च रोड, पुणे-४११००१ या पत्त्यावर स्विकारले जाणार आहेत. तक्रार अर्ज स्विकारल्यानंतर ज्या विभागाशी संबंधित तक्रार आहे त्या विभाग प्रमुखाकडे अर्ज पाठविण्यात येतील. संबंधित विभागप्रमुख हे तक्रारींवर केलेल्या अहवालासह लोकशाही दिनाच्या दिवशी उपस्थित राहणार आहेत. अर्जदारास महिला लोकशाही दिनानंतर कमाल एक महिन्याच्या आत अंतिम उत्तरे दिली जाणार आहेत.महिला लोकशाही दिनात अर्ज करण्यासाठी तक्रार, निवेदन वैयक्तीक स्वरुपाचे असावे, तक्रार अर्ज दोन प्रतीत तसेच विहित नमुन्यात असावा. न्यायप्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले,सेवा व आस्थापनाविषयक बाबी, तक्रार, निवेदन वैयक्तीक स्वरुपाचे नसेल तर अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असेही उप आयुक्त संजय माने यांनी कळविले आहे

सुराज्य सोलापूर Classified
नोकरी विषयक
Ex. Service Man at
**Valsang Toll Plaza**
(Neeraj kumar)
interested Candidate
Contact at Toll Plaza.
Mob No. : 9028919046
(120623)

# पालकमंत्र्यांनी केली विठ्ठल मंदिर परिसराची पाहणी

सुराज्य/पंढरपूर

**पंढरपूर आषाढी वारीच्या पार्श्वभूमिवर श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर, शहर व परिसरात भाविकांना देण्यात सोयी सुविधांचा आढावा घेण्यासाठी महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज मंदिर व परिसर, महाद्वार चौक, नदीपात्र, पत्रा शेड, ६५ एकरची पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या.**



यावेळी त्यांच्यासमवेत खासदार रणजीतसिंह नाईक-निंबाळकर, आमदार समाधान आवताडे, विभागीय आयुक्त सौरभ राव, प्र. जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, अतिरीक्त पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, प्रांताधिकारी गजानन गुरव, तहसीलदार सुशील बेल्हेकर, मुख्याधिकारी अरविंद माळी आदिंसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

आषाढी वारीमध्ये प्रथा परंपरेप्रमाणे पादुका स्नानाचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याने महाद्वार घाटावरून नदीपात्रात या सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. पोलीस प्रशासनाने घाटावरील गर्दीचे योग्य नियोजन करावे. तसेच महाद्वार घाटावरील अडथळादायी वायर्सच्या पार्श्वभूमिवर आवश्यक ती दक्षता घ्यावी. मंदिर परिसरातील अतिक्रमणे तात्काळ काढावीत, जेणेकरून भाविकांना अडथळा येणार नाही, असे ते म्हणाले.

चंद्रभागा नदीपात्रातील पाणी स्वच्छ रहावे, यासाठी आषाढी एकादशीपूर्वी ७ दिवस पाणी सोडण्याच्या सूचना संबंधितांना करून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, चंद्रभागा नदी पात्रातील खड्डे बुजवावेत. नदी पात्रात धोक्याच्या ठिकाणी बॅरिगेट्स तसेच धोक्याच्या ठिकाणाची माहिती देणारे फलक लावावेत. नदीपात्र वेळोवेळी स्वच्छ राहील, याची दक्षता घ्यावी, असे ते म्हणाले.

मंदिराभोवती पत्र्याचा निवारा शेड करण्याच्या, आवश्यकतेनुसार पंखे लावण्याच्या सूचना करून पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले दर्शन रांग अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने गरजेनुरूप खाजगी जागेवर मांडव उभा करून भाविकांची व्यवस्था करावी व त्या ठिकाणी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध कराव्यात. दर्शन रांगेत गर्दी न करता मोकळे वातावरण राहील याबाबतची व्यवस्था करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या.

वारी कालावधीत भाविकांना सुलभ दर्शन घडावे, यासाठी मंदिर समितीने आवश्यक नियोजन करावे. दर्शन रांग व दर्शन मंडपात स्वच्छता राखावी तसेच मॅटची व्यवस्था करावी. स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, असे सांगून श्री, विखे पाटील यांनी गर्दी व्यवस्थापनाच्या अनुषंगाने पत्राशेडच्या ठिकाणी मोकळ्या जागेत मंडप उभा करावा, यामुळे वारकरी भाविकांबरोबरच अधिकारी, कर्मचारी, भोजन व्यवस्था देणाऱ्या कर्मचाऱ्यांना सावली मिळेल, शौचालयाची वेळोवेळी स्वच्छता राखण्यासाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी. तसेच त्याठिकाणी मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध राहील याची दक्षता घ्यावी, अशा सूचना केल्या.

यंदा प्रथमच मानाच्या पालख्यांसमवेत नव्याने येणाऱ्या दिंड्यांना ओळखपत्र देण्यात येणार असल्याचे सांगून पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले, नोंदणीकृत नसलेल्या दिंड्यांना सुविधा देणे अवघड होऊ शकते, त्यामुळे अनोंदणीकृत पालख्या व दिंड्यांनी मंदिर संस्थानकडे नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

आपण संपूर्ण पालखी मार्ग व तळाची पाहणी केली असून विभागीय आयुक्त सौरभ राव यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर, पुणे आणि सातारा अशा तिन्ही जिल्ह्यातील पालखी मार्गावर चांगल्या व्यवस्थेचे नियोजन झाले असल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

# मोहिते-पाटलांच्या बलराज अश्वाचे देहूकडे प्रस्थान

सुराज्य/अकलूज

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी काँग्रेसचे सोलापूर जिल्हाध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या बलराज या स्वाराच्या अश्वाचे आज (शुक्रवार) दि .९ जून रोजी श्री क्षेत्र देहूकडे प्रस्थान झाले.



पंढरपूरच्या आषाढी वारीला जाण्यासाठी मोठ्या संख्येने लाखो भाविक श्री क्षेत्र देहूमध्ये दाखल होऊ लागले आहेत.उद्या शनिवारी (दि.१० जून) दुपारी दोनच्या सुमारास श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे मंदिरातून प्रस्थान होणार आहे.त्यासाठी देहूनगरी सज्ज झाली आहे तर या पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी मोहिते पाटील यांचा बलराज हा स्वाराचा अश्व मार्गस्थ झाला आहे .

आज (शुक्रवार) सकाळी ११ :३० वाजता मोहिते पाटील यांच्या धवलनगर येथील प्रतापगडावर बलराज या स्वाराच्या अश्वाची विधीवत पूजा काँग्रेसचे सोलापूर जिल्हाध्यक्ष डॉ धवलसिंह मोहिते पाटील व सौ. उर्वशीराजे मोहिते पाटील या उभयतांच्या हस्ते झाली.यावेळी आण्णासाहेब इनामदार,माणिकराव मिसाळ,शिवाजीराव इंगवले देशमुख,काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सतीश पालकर,नाना काळे आदींसह भाविक उपस्थित होते.हा अश्व आज सायंकाळी वाहनाने श्री क्षेत्र देहू येथे पोहोचेल .

राज्याचे माजी सहकार राज्यमंत्री स्वर्गीय प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्याकडे देहू संस्थानने अश्वाची मागणी केली होती.तेंव्हापासून मोहिते-पाटील घराण्याचा अश्व पालखी सोहळ्यात सहभागी होतो.असे डॉ.धवलसिंह मोहिते पाटील यांनी सांगितले .

बलराज हा अबलक अश्व उदयपूर राजघराण्यातील जयराज या अश्वाचा नर आहे . तो चार वर्षाचा असून पालखी सोहळ्यात पाठविण्यापूर्वी त्याचा रोज सराव घेतला जात होतो. पालखी सोहळ्यात लाखो लोक अश्वाचे दर्शन घेतात.त्याच्या अंगाला स्पर्श करतात.यावेळी तो विचलित होवू नये म्हणूनही त्याला खास प्रशिक्षण दिले जाते.त्याचा खुराक,पाणी व देखभाल करण्यासाठी शशिकांत बीटे व हसन शेख हे दोन सेवक अश्वाबरोबर असणार असल्याचेही डॉ मोहिते पाटील यांनी सांगितले.

शनिवारी पालखी प्रस्थान सोहळ्यात होणारे धार्मिक कार्यक्रम पुढीलप्रमाणेः पहाटे ५ वाजता-श्री'ची संत तुकाराम शिळा मंदीर,श्री विठ्ठल-रखुमाई महापूजा

पहाटे ५.३० वाजता-तपोनिधी नारायण महाराज समाधी महापूजा सकाळी ९ ते ११ वाजता-श्री संत तुकाराम महाराज पादुका पूजन,इनामदार वाडा.

सकाळी १० ते १२ वाजता-पालखी प्रस्थान सोहळा काला कीर्तन दुपारी २ वाजता-पालखी प्रस्थान सोहळा,अश्व व दिंड्यांचे देउळवाड्यात आगमन सायंकाळी ५ वाजता-पालखी प्रदक्षिणा सायंकाळी ६.३० वाजता-पालखी सोहळा मुक्काम, इनामदार वाडा,मुख्य आरती. रात्री ९ वाजता कीर्तन,जागर आदी कार्यक्रम होणार आहेत .

## कुसमोड येथील २२३ शेतकरी पी. एम. किसान योजनेपासून वंचित

सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील २२३ शेतकऱ्यांनी अदयापही ई केवायसी केली नाही .त्या शेतकऱ्यांनी ताबडतोब ई केवायसी करणे आवश्यक आहे अन्यथा ते शेतकरी पि एम किसान सन्मान योजनेतील १४ व्या हप्तापासुन वंचीत राहणार आहेत हे निश्चित आहे. यासाठी सदर शेतकऱ्यांनी आधार कार्ड व आधार कार्डला लिंक असणारा मोबाईल नंबर घेऊन कृषी सहहयाक बुगड यांना कुसमोड येथील ग्रामपंचायत कार्यालयात भेटणयाचे आवाहन कृषी सहहयाक बुगड यांनी केले आहे.



# शेतकरी उत्पादक कंपनी काळाची गरज : मोरे

## निंबर्गी येथे खरीप पूर्व हंगाम बैठक

सुराज्य/दक्षिण सोलापूर

महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना वैयक्तिक लाभापेक्षा सामूहिक शेतकरी उत्पादक कंपनींना शासन भर देत आहे. यामुळे शेतकऱ्यांनी शेतकरी उत्पादन कंपनी स्थापन करणे ही काळाची गरज आहे. शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून शासन नवनवीन योजना आणत आहे.यामुळे आगामी काळात शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शेतकरी उत्पादन कंपनी स्थापन करावी असे आवाहन सोलापूर कृषि उपसंचालक राजकुमार मोरे यांनी केले आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील निबर्गी येथे खरिप हंगाम पूर्व बैठक काल सकाळी दहा वाजता निबर्गी ग्रामपंचायत कार्यालय येथे संपन्न झाला.

यावेळी या कार्यक्रमाला सोलापूर कृषि उपसंचालक राजकुमार मोरे, तालुका कृषी अधिकारी रामचंद्र माळी,मंडळ कृषी अधिकारी शिल्पा कसबे, मंडळ कृषी अधिकारी मंद्रूप केरप्पा लादे, निबर्गी गावचे सरपंच श्रीदीप हसापुरे, उपसरपंच पीरसाहब हवालदार,पशुधन विकास अधिकारी सत्यजित पाटील, बँक ऑफ इंडियाचे शाखाधिकारी महेश पाटील, तलाठी श्याम काळे, निबर्गी गावचे कृषी सहाय्यक अशोक राठोड, ग्रामपंचायत सदस्य अरुण बिराजदार, गंगाधर बिराजदार आदी मान्यवर उपस्थित होते.

खरीप हंगाम शेतकरी मेळाव्यात सोलापूर जिल्ह्याचे कृषी उपसंचालक राजकुमार मोरे मार्गदर्शन करताना म्हणाले की, बीजप्रक्रिया, बियाणे उगम क्षमता, निर्यातक्षम द्राक्ष बेदाणा,आंबा व केळी निर्यात वाढवणे, केंद्र सरकार व राज्य सरकार आता शेतकऱ्यांना वैयक्तिक लाभ न देता सामूहिकरीत्या शेतकरी कंपनीच्या माध्यमातून जास्तीत जास्त लाभ देण्याचा प्रयत्न शासन करीत आहे यामुळें भविष्यात शेती हे सामूहिकरीत्या असलेल्या शेतकरी उत्पादक कंपन्यांना लाभ शासन देणार आहे. यामुळे निम्बर्गी गावातील सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गावात शेतकरी उत्पादन कंपनीची स्थापन करावी व ही काळाची गरज आहे.

यावेळी दक्षिण सोलापूर तालुक्याचे कृषी अधिकारी रामचंद्र माळी हे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी पीएम किसान केवायसी व आधार कार्ड अपडेट करून घेऊन पीएम किसान योजनेचा लाभ घ्यावा तसेच जास्तीत जास्त शेतकरी कृषी विभागाच्या अनेक योजनांचा लाभ घ्यावा असे आव्हान त्यांनी केले.

यावेळी राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत निम्बर्गी गावातील पाच शेतकऱ्यांना महाडीबीट पोर्टलच्या माध्यमातून ट्रॅक्टरचलित औषध ब्लोर वाटप करण्यात आले तसेच वृक्ष लागवड ही करण्यात आले.

या कार्यक्रमाला निम्बर्गी गावातील शेतकरी बांधव व पदाधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन कृषी सहाय्यक अशोक राठोड यांनी मानले.

# प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांसाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी

सुराज्य/सांगोला

हलदहिवडी व परिसरातील रुग्णांना गावातच प्राथमिक उपचार मिळावा म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र निधी सन २०१६-१७ मधून रुग्णांना सर्व सोयीसुविधा उपलब्ध असणार्या इमारती बांधून गेली कित्येक वर्ष पूर्ण झाल्या आहेत. मात्र शासनस्तरावरुन या आरोग्य उपकेंद्रासाठी वैद्यकीय अधिकारी, कर्मचायांच्या नियुक्त्या न केल्यामुळे सध्या या रंगरंगोटी केलेल्या इमारती गावातील शोभेच्या वस्तू बनल्या आहेत. शासनाने तात्काळ या प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांसाठीवैद्यकीय अधिकारी-कर्मचायांची नेमणूक करुन गोरगरीब नागरिकांना वैद्यकीय सेवा सुरु करावी. अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. गोरगरीब, नागरिक, अंध, अपंगांना नाममात्र शुल्क भरून वैद्यकीय सेवा मिळावी यासंकल्पनेतून हलदहिवडी येथे ८४ लाख रु. खर्चून सर्व सुविधा उपलब्ध असणारी इमारत बांधून पुर्ण झाली आहे.

**तालुका वैद्यकीय अधिकारी यांना याचे गांभीर्य नाही. तर नागरिक उपकेंद्रात उपचार मिळेल या आशेवर आहेत. याबाबत आरोग्य मंत्री मा. ना. प्रा. डॉ. तानाजीराव सावंत तसेच तालुक्याचे लोकप्रतिनिधी यांनी या प्रलंबित प्रश्नाकडे लक्ष देवून ह. दहिवडी येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र सुरू करावे, अशी मागणी हलदहिवडी ग्रामस्थांनी केली आहे.**




तत्कालीन तालुका वैद्यकीय अधिकारी यांचेकडून या प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांसाठी वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी यांची पदे नियुक्त करणेकामी जिल्हा आरोग्य अधिकारी सोलापूर यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.परंतु वर्षा न वर्ष उलटुन गेली मात्र कर्मचारी यांच्या नियुक्त्या रखडल्या आहेत.

यावर शासनाकडून अद्याप प्रस्तावावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. सध्या या इमारती बांधून पूर्ण असल्या तरी नागरिकांना वैद्यकीय सेवेसाठी आणखी किती दिवस वाट पहावी लागणार आहे. हे सांगणे कठीण आहे.हलदहिवडी येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी इमारती बांधून पूर्ण आहेत. लाखो रुपये खर्च करून बांधकाम केले मात्र आज इमारत जीन नादुरुस्त होत आल्यातरी उद्घाटनाचा मुहूर्त मिळेनासा झाला आहे.

# दसूर येथील चाँद साहेब येथील समस्या सोडवण्याची मागणी

सुराज्य/वेळापूर

माळशिरस तालुक्यातील दसूर येथील चाँद साहेब हे ठिकाण येथील सत्ताधाऱ्याकडून दुर्लक्षित झाले असून येथे येणाऱ्या अनेक भाविक भक्तांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे येथील स्थानिक सत्ताधाऱ्यांनी याकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी येथे येणाऱ्या भाविक भक्ताकडून केली आहे.

हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असणारे व सर्वांना समतेचा संदेश देणारे चाँद साहेब यांचे दुर्मिळ ठिकाण दसुर येथे वसले आहे. अगदी सोलापूर जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून श्रद्धा असणारे अनेक भाविक भक्त त्या ठिकाणी गुरुवारी पाणी घालण्यासाठी येत असतात. गुरुवारी पाणी घालणे हे पवित्र मानले जाते त्याचबरोबर या ठिकाणी बोकडाचा बळी देऊन शिधा करण्याची देखील प्रथा आहे. पण हे जुने ठिकाण असताना सुद्धा अजून येथील सत्ताधाऱ्यांना या ठिकाणी जाणारा रस्ता करता आला नाही. अगदी पाचशे मीटरवर गाड्या थांबवूनच या ठिकाणी जावे लागते. दुचाकी स्वारांना ओबडधोबड रस्ता असल्याने जीव मुठीत घेऊन जावे लागते यादरम्यान ओढा देखील आहे तिथेही खूप मोठी अडचण आहे. मंदिराजवळ गेल्यानंतर ब्लॉक वगैरे काहीही टाकले नसल्याने भाविक भक्तांची खूप मोठी गैरसोय होत आहे. महिलांना प्रदक्षिणा मारताना काट्याकुट्यातून प्रदक्षिणा माराव्या लागतात. सदर ठिकाणी पाण्याची कुठलीच सोय असल्याने पाणी भावीक भक्तांना घरूनच घेऊन या ठिकाणी यावे लागते. उन्हाळ्यात या स्थळी कसेबसे जाता तरी येते मात्र पावसाळ्यात या ठिकाणी जाण्यासाठी खूप मोठी कसरत करावी लागते. त्यामुळे इतके हे मंदिर जुने असून देखील आजपर्यंत ग्रामपंचायत मधील सत्ताधाऱ्यांनी याकडे का दुर्लक्ष केले आहे असा सवाल या ठिकाणी येणाऱ्या परगावच्या भाविक भक्ताकडून व्यक्त केला जात आहे. निधी तर वरिष्ठ पातळीवरून भरपूर येतो आहे मग इथे भाविक भक्तांच्या सोयी सुविधेसाठी ग्रामपंचायत का पुढाकार घेत नाही असा प्रश्नही भाविक भक्तांच्या मनाला पडला आहे.



त्यामुळे तात्काळ या प्रकरणी वरिष्ठ नेते मंडळी व अधिकाऱ्यांनी लक्ष घालून असंख्य भाविक भक्तांन साठी सोयी उपलब्ध करून द्याव्यात.

सुराज्य सोलापूर
शनिवार, दि. १० जून २०२३


# भाजपा कार्यकर्ते वाऱ्यावर..
# पालकमंत्री जानकरांच्या दारावर..

### ▸ पालखी नियोजनाच्या नावाखाली पालकमंत्र्यांचा राजकीय दौरा

✔ सुराज्य/अकलूज

**सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा पालखी नियोजनासाठी नुकताच माळशिरस दौरा पार पडला पण हा दौरा पालखी नियोजनासाठी झाला की तो दौरा राजकीय होता अशा चर्चांना सध्या उधान आलेले दिसत आहे. तर दुसरीकडे पालकमंत्री भाजपाचे असून सुद्धा भाजपाच्याच कार्यकर्त्यांची त्यांनी निराशा केल्याची चर्चा सध्या जोरात सुरू आहे.**



पालखी सोहळ्यासाठी सध्या प्रशासन विभाग कामाला लागलेले दिसत आहे. नुकताच प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांचा देखील दौरा झाला या दौऱ्यामध्ये त्यांनी पालखी सोहळ्यासाठी ज्या ज्या कमतरता आहेत त्या जाणून घेऊन त्यावर तातडीच्या उपाययोजना सुचवल्या. एकूणच प्रशासन जोरदारपणे कामाला लागलेले दिसत असताना राजकारणी मंडळी मात्र आपल्या पदाचा गैरवापर करत पालखी नियोजनाच्या नावाखाली राजकिय दौरे करताना दिसत आहेत. नुकताच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा माळशिरस तालुका दौरा पार पडला. या दौऱ्यामध्ये माढा लोकसभेचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर हे देखील जातीने हजर होते. पण त्यांचा कौल पालखी नियोजनापेक्षा राजकिय गाठीभेटी घडवून देण्याकडेच जास्त होता अशी चर्चा आता या निमित्ताने रंगू लागली आहे.त्याचे असे झाले कि, पालकमंत्री आल्यानंतर खासदारच पुढे पुढे करताना दिसत होते. या झालेल्या दौऱ्यामध्ये ठिकठिकाणी भाजपचे कार्यकर्ते पालकमंत्र्याच्या स्वागतासाठी थांबले होते पण या कार्यकर्त्यांना पालकमंत्री आणि खासदार साहेब भेटू शकले नाहीत.

अर्थातच पालखी नियोजनाचा दौरा असल्यामुळे नेते आपल्याला भेटू शकले नसतील अशी मनाची समजूत घालून भाजपा कार्यकर्ते गप्प बसले पण पुढे जाऊन पालकमंत्र्यांनी आपला मोर्चा खासदार नाईक निंबाळकर यांच्या सांगण्यावरून राष्ट्रवादीचे उत्तम जानकर यांच्या घरी वळवला आणि राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांबरोबर त्यांनी भेट घेतली त्यांच्याबरोबर फोटोसेशन केले. आणि भाजपाचे कार्यकर्ते मात्र ठिकठिकाणी ताटकळत उभे राहिलेले दिसले त्यामुळे भाजपाच्या कार्यकर्त्यांची पुरती निराशा झालेली दिसली.

अनेक भाजप कार्यकर्त्यांना पालखी संदर्भात आपली निवेदने द्यायची होती पण पालकमंत्र्यांनी आणि खासदारांनी भाजपा कार्यकर्त्यांच्या राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेत त्यांची सर्व निवेदने स्वीकारली यामुळे भाजप पदाधिकाऱ्यांमध्ये व कार्यकर्त्यांमध्ये असंतोषाची लाट निर्माण झाली असून पालकमंत्री आणि खासदार यांचे वागणे अनेकांना खटकलेले दिसत आहे.

## १० जूनला तुकोबांची तर ११ जूनला माऊलींची पालखी पंढरपूरकडे प्रस्थान होणार

✔ सुराज्य/पुणे



आषाढी वारी म्हटलं की हातात टाळ घेऊन हरिनामाच्या जल्लोषात मग्न झालेले वारकरी पटकन डोळ्यासमोर येतात. दरवर्षी देहू येथून तुकोबांची आणि आळंदीहून ज्ञानोबांची पालखी पंढरपूरला विठ्ठलाच्या भेटीसाठी जाते. त्याबरोबर 'माऊली माऊली, ज्ञानोबा माऊली तुकाराम, विठ्ठल विठ्ठल, जय हरी विठ्ठल' असा हरिनामाचा गजर करींत लाखो वारकरींदेखील आळंदीहून पंढरपूरला पायी जातात. आषाढी वारी हा संपूर्ण महाराष्ट्राचा उत्सव असून या काळात सर्वत्र उत्साह आणि चैतन्याचे वातावरण असते.

दरम्यान संताच्या पालख्यांचे पंढरपूरकडे प्रस्थानाचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. जगदगुरू श्री संत तुकाराम महाराज संस्थानाकडून जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, तुकोबांची पालखी १० जून २०२३ रोजी देहू येथून पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करणार आहे. श्री ज्ञानेश्वरमहाराज संस्थान कमिटीकडून जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार आळंदी येथून जेष्ठ कृष्ण अष्टमी म्हणजेच ११ जून २०२३ रोजी ज्ञानोबांच्या पालखीचे पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान होणार आहे.

### संत तुकोबा महाराज पालखी वेळापत्रक

- २० जून रोजी बेलवडी येथे गोल रिंगण सोहळा
- २२ जून रोजी इंदापूर येथे गोल रिंगण सोहळा
- २४ जून रोजी अकलूज माने विद्यालय येथे गोल रिंगण
- २५ जून रोजी माळीनगर येथे उभं रिंगण
- २७ जून रोजी बाजीराव विहिर येथे उभं रिंगण सोहळा
- २८ जून रोजी वाखरी येथे उभं रिंगण सोहळा

### संत ज्ञानोबा महाराज पालखी वेळापत्रक

- २० जून रोजी चांदोबाचा लिंब येथे उभं रिंगण सोहळा
- २४ जून रोजी पुरंवडे येथे गोल रिंगण सोहळा
- २५ जून रोजी खुडूस फाटा येथे गोल रिंगण
- २६ जून रोजी ठाकूरबुवाची समाधी येथे गोल रिंगण सोहळा
- २७ जून रोजी बाजीरावची विहीर येथे गोल आणि उभं रिंगण सोहळा
- २८ जून रोजी वाखरी येथे उभं रिंगण सोहळा

माजी शिक्षणाधिकारी
विद्याधर जगताप यांना वाढदिवसानिमित्त व लग्नाच्या वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा..!



शुभेच्छुक
वृषाली, वनिता, वैभव, अपेक्षा, प्रसाद, तनुजा, सचिन, अनुप, राशी, आरूष, रेयांश, गौरी, जान्हवी, अवनिश
समस्त जगताप परिवार, कुर्डूवाडी

## मागील भांडणाच्या कारणावरून तरूणाच्या पोटात खुपसला चाकू

✔ सुराज्य/सोलापूर

मागील भांडणाच्या कारणावरून तरूणाच्या पोटात चाकू मारून जखमी केल्याप्रकरणी आठ जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अनिकेत बालाजी सुळ ( वय २४, रा. सुनील नगर, अक्कलकोट रोड) यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आठ जणांवर गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी सुळ हा मुरारजी पेठ येथे थांबलेला असताना त्याला आठ जणांनी येऊन पैश्याच्या कारणावरून शिवीगाळ करत मारहाण करण्यास सुरूवात केली. यावेळी वैभव गुंड याने सुळच्या पोटात चाकू मारून जखमी केले तर ऋषीकेश जाधव याने फायटरने मारून जखमी केले. याप्रकरणी अक्षय जाधव, विक्रांत जाधव, निखिल जाधव, ऋषीकेश जाधव, ऋषीकेश घुमटे, वैभव गुंड, अनिल हिंगमिरे, अक्षय होळकर ( सर्व रा. सोलापूर) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास सपोनि गायकवाड करत आहेत.

## भोगाव येथील कचरा डेपोची आग नियंत्रणात!

### आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाचे शर्तीचे प्रयत्न

✔ सुराज्य/सोलापूर



भोगाव येथील कचरा डेपोला लागलेली आग नियंत्रणात आली आहे. सातत्याने चारी बाजूंनी पाणी मारल्याने आग आटोक्यात आली आहे, अशी माहिती महापालिका अग्निशामक दल प्रमुख केदारनाथ आवटे यांनी दिली.

सोलापूर महापालिकेच्या भोगाव येथील कचरा डेपोस उन्हाच्या तीव्रतेमुळे गुरूवारी आग लागली. मागील वर्षी लागलेल्या आगीप्रमाणे ही आग मोठ्या प्रमाणात व विस्तारित क्षेत्रात नाही. ठराविक एरियामध्ये ही आग लागली आहे. साधारणतः या डेपोतील एक एकर जागेमध्ये ही आग लागली आहे. या घटनेनंतर सोलापूर महापालिका अग्निशामक दलाचे प्रमुख केदारनाथ आवटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही आग विझवण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. काल रात्री जास्त प्रमाणात ही आग होती मात्र अग्निशामक दलाने नियोजनपूर्वक चारी बाजूने पाणी मारून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला आहे. उन्हामुळे ही आग लागली आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे कचऱ्यातील मिथेन वायू पेट घेतो आणि त्यामुळे आग लागते.

**१.१० गाड्या पाणी वापर**


आग लागल्यापासून शुक्रवारी सायंकाळपर्यंत एकूण ११० गाड्या पाण्याचा वापर करून ही आग विझवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यासाठी अग्निशामक दलातकडील ७ फायर फायटर वाहन तसेच बायोमायनिंग प्रकल्पाकडील एक टँकरचा उपयोग करण्यात येत असल्याचेही अग्निशामक दल प्रमुख केदारनाथ आवटे यांनी सांगितले.

डेपोतील बायो एनर्जी प्रकल्पाकडूनही तेथील पाणी आग विझवण्यासाठी देण्याचे सहकार्य करण्यात आले आहे. यामुळे रुपाभवानी येथील केंद्रातून अग्निशामक दलाच्या गाड्यांच्या फेऱ्या आणि वेळ वाचला आहे. साधारणता: दोन दिवसात पूर्णपणे आग आटोक्यात येण्याची शक्यता आहे, असे अग्निशामक दल प्रमुख केदारनाथ आवटे यांनी सांगितले.

## पाऊस चांगला झाला, पिकांचे उत्पादन वाढेल

### ▸ जिल्हा कृषी अधीक्षकांची माहिती

✔ सुराज्य/सोलापूर



गतवर्षीप्रमाणे जिल्ह्यात पाऊस चांगला झाला तर यंदाच्या वर्षीही खरिपाच्या पेरण्या चांगल्या होतील अन्यथा पाऊस कमी प्रमाणात झाला तर खरीप पेरण्यांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. असा अंदाज जिल्हा कृषी अधीक्षक गावसाने यांनी सांगितले.

मागील वर्षी मे आणि जूनमध्ये अवकाळी पावसाच्या अधूनमधून सरी येत होत्या. त्यामुळे वेळेवर पडणाऱ्या पावसाचे आणि अधूनमधून पडलेल्या पावसाचे खरीप पिकाला चांगले जीवदान मिळाले होते. त्यामुळे मागच्या वर्षी खरीप पिकांचे बऱ्यापैकी शेतकऱ्यांना उत्पन्न मिळाले होते. मागील वर्षी तीन लाख ५९ हजार हेक्टरवर खरीप पिकाचे लागण करण्यात आली होती. यामध्ये ४७१७ हेक्टर सोयाबीन, ९० हजार २६२, सूर्यफूल १२ हजार ६२८, तुर ८४ हजार ६९७, मूग ९०००, उडीद ६९ हजार २५०, हेक्टर तृणधान्य बाजरी २१ हजार १५९, मका ६० हजार ४१५ अशा प्रकारचे मागील वर्षी खरीप पिकाची जिल्ह्यामध्ये पेरणी झाली होती. या खरीप हंगामामध्ये भुईमूग सोयाबीन आणि सूर्यफूल गळीत धान्य होते तसेच बाजरी ज्वारी आणि मका रो धान्य घेण्यात आली होती. या खरीप हंगामामध्ये ऊस पिकाचे लागवडीचे क्षेत्रफळ वेगळे होते. खरीप हंगामामध्ये जिल्ह्यात एकूण तीन लाख ५९ हजार हेक्टरवर ही खरीप पिके घेण्यात आली होती. खरीप पिकाचे पेरण्या हेक्टर मध्ये कमी जास्त होऊ शकतात असेही कृषी अधीक्षक गावसाने यांनी सांगितले.



### दुचाकीची चोरी

✔ सुराज्य/सोलापूर

जुना विडी घरकुल येथील सागर चौक येथून रवी भुमय्या दोरा (वय-३८,रा.जुना विडी घरकुल) यांच्या घरासमोर लावलेली दुचाकी अज्ञात चोराने चोरली. याबाबत दोरा यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून अज्ञात चोरावर गुन्हा दाखल झाला. घटनेचा तपास पोलिस करत आहेत.





मा. आमदार
सुभाष बापू देशमुख
यांच्या विशेष प्रयत्नातून
भूमिपूजन
दिनांक : शनिवार १० जुन २०२३

बोळकवठे ते नांदणी रस्ता
३ कोटी ६० लक्ष
वेळ : सकाळी ९ वा.
स्थळ : मौ. बोळकवठे द. सोलापूर.

इंगळगी ते होटगी रस्ता
१ कोटी २५ लक्ष
वेळ : सायं ६ वा.
स्थळ : मौजे इंगळगी ता.द. सोलापूर.

* शुभहस्ते *
मा.आ. सुभाष (बापू) देशमुख
विधानसभा सदस्य, दक्षिण सोलापूर
सौजन्य : दिग्विजय कन्स्ट्रक्शन, दत्तात्रय एस. मुळे. सोलापूर., श्री लक्ष्मी एंटरप्रायजेस, कुडल

## सोलापुरात भीमसैनिकांचा आक्रोश मोर्चा

### भालेरावच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा देण्याची मागणी

✔ सुराज्य/सोलापूर



नांदेड जिल्ह्यातील बोंडार गावात अक्षय भालेराव या तरुणाचा हत्येच्या निषेधार्थ शहरातून भीमसैनिकांनी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे, अन्यथा पेन सोडून दुसरा विचार करावा लागेल, असा इशारा देण्यात आला आहे.

हातात निळे झेंडे, डोक्यावर निळी टोपी, आणि महिला व युवतींनी हातामध्ये फलक घेऊन हा मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निघाला. हा मोर्चा सिद्धेश्वर मंदिरासमोरून पासपोर्ट कार्यालयाकडून जिल्हाधिकारी कार्यालयावर आला आणि या ठिकाणी मोर्चाचे रूपांतर सभेमध्ये झाले. अक्षय भालेराव यांच्या कुटुंबियातील सदस्यास सरकारी नोकरीमध्ये समाविष्ट करून घेण्यात यावे. तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात यावा, आरोपीची सर्व मालमत्ता जप्त करण्यात यावी आणि त्यांच्या घरावर बुलडोजर फिरवण्यात यावा. मारेकऱ्यांबरोबर या कटातील मास्टरमाईंड पर्यंत पोहोचण्याकरिताआरोपी आणि सहकार्य करणाऱ्या सर्व राजकिय पक्षातील नेत्यांचा सीडीआर तपासण्यात यावे, अक्षय भालेराव यांच्या कुटुंबीयास पन्नास लाखाची शासकिय मदत जाहीर करण्यात यावी. महाराष्ट्रातील सर्व बौद्धांना शस्त्र परवाने देण्यात यावे अशा मागण्या करण्यात आल्या. यावेळी आतिश बनसोडे, उमेश काळे, सचिन वाघमारे, पिंटू डावरे, प्रवीण कांबळे, रेश्मा मुल्ला, पल्लवी सुरवसे, वैशाली उबाळे, साधना गायकवाड, अखिल शाक्य, अण्णासाहेब वाघमारे, केरू जाधव, दिपक गवळी, प्रणव पात्रे, अमित गायकवाड, प्रवीण सुरवसे, विनोद जाधव, अविनाश आठवले, बाळासाहेब बनसोडे, विशाल चतुर, विशाखा उबाळे, सचिन कोलते, पंकज ढसाळ, सिद्धार्थ गुड्डे, राजरत्न कदम, उमेश काळे, प्रवीण सुरवसे यांच्यासह संघटना या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.